

सुजाता सिद्ध
रानाईची
गर्दी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# रानाईची गढी

## लेखिका : सुजाता शेखर सिद्ध

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# रानाईची गढी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रानाईची गढी

## लेखिका : सुजाता शेखर सिद्ध

२. पत्ता : बी-२६ आनंदवन रेसिडेन्सी , आनंद नगर , सिंहगड रोड, हिंगणे खुर्द ,पुणे -५१

फो. न. : ९१५८५८७६७६

e-mail agastyaa45@gmail.com

मुखपृष्ठ: सुनीळ सामंत

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

साहित्यप्रेमी वाचकांना नमस्कार,



प्रथम मी सर्व वाचकांचं मन:पूर्वक अभिनंदन करते, कारण नेटफ्लिक्स, यु ट्यूब, एम एक्स प्लेअर अशी तगडी मनोवेधक साधनं उपलब्ध असताना पुस्तक वाचनाकडे वळणे ही खरोखरच कौतुकाची बाब आहे , तसंच ' ई' साहित्य यांचंही कौतुक वाटतं कारण काळाची गरज ओळखून वाचकांना सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीने साहित्य पुरवायची अभिनव कल्पना साकारून नवीन पिढीत विझत चाललेला आपला मराठी साहित्याचा दिवा तेवत रहावा ही काळजी त्यांनी घेतली आहे . असो, माझा परीचय माझ्या लिखाणातून होईलच, कारण जे आपल्याला पोटातून वाटतं तेच ओठात उतरतं त्यासाठी लेखणी हे अतिशय प्रभावी माध्यम आहे असं मला वाटतं .

माझा ढोबळ परिचय सांगायचा म्हणजे माझं नाव 'सुजाता शेखर सिद्ध', वाचनाची आवड लहानपणापासूनच होती त्याला खतपाणी माझ्या वडिलांनी घातलं,मला आठवतंय तेव्हापासून मी आणि माझी मोठी बहीण आम्ही किराणा मालाच्या दुकानातून वस्तूंना गुंडाळून आलेला कागद देखील अधाशासारखा वाचायचो . मे महिन्याच्या सुट्टीत वडील आम्हाला वाचायला पुस्तकं आणून देत असत ते एकदा वाचायला लागलो की ईतकं गुंगून जायला व्हायचं की आईने कितीही ओरडून आवाज दिला तरी कानात शिरायचा नाही . भूक तहान विसरून वाचायचो आम्ही .

पु . ल. देशपांडे, शांताबाई शेळके, रत्नाकर मतकरी, व पु. काळे, शिवाजी सावंत, हे सगळे फेव्हरेट लेखक .

आणि त्यांच्यासारखंच आपलंही पुस्तक असंच कधीतरी एका बैठकीत वाचलं जावं ही मनीषा तेव्हा असायची, आता मोठं झाल्यावर कळतं की एवढी ताकद आपल्या लेखणीत येणं यासाठी केवढी प्रतिभा लागते त्यामुळे असा 'अविचार' !. आता मी करत नाही, पण आपलं लेखन रसाळ, सरळ आणि साधं वाटावं आणि लोकांना किमान आवडावं ही अपेक्षा माझ्या लिखाणाकडून जरूर बाळगते .

काही वर्ष मी क्लासिकल गाण्यांच्या प्रोग्रॅम मधून निवेदन करायचे, अर्थात स्वतः: लेखन करताना गाणी असो अथवा एखादी बंदिश असो, तिच्याबद्दल सखोल आणि रंजक माहिती मिळाली पाहिजे या गोष्टीकडे मी लक्ष देत असे त्यामुळे प्रोग्राम संपल्यावर लोक आवर्जून निवेदना बद्दल दाद देत असत, शिवाय यु ट्युब वरही मी काही कथा टाकल्या आहेत, काही माझ्या आवाजात आहेत . कथांचे विषय वेगवेगळे आहेत, काही गूढ, काही कौटुंबिक, काही रहस्य कथा, आहेत, आणि सर्व त्या त्या विषयाचा अभ्यास करून लिहिलेल्या आहेत, अगदी कौटुंबिक कथा लिहिताना देखील सायकॉलिजिचा अभ्यास केलेला आहे . आताचं पुस्तक एका रहस्यावर आधारित आहे . वाचकांना आवडेल अशी आशा करते .

धन्यवाद !..

सुजाता सिद्ध, पुणे .

अर्पणपत्रिका :

सर्व प्राणी मात्रांमध्ये मनुष्य प्राणी श्रेष्ठ समजला जातो कारण त्याला परमेश्वराने नुसती बुद्धी दिलेली नसून वैचारीक बुद्धी दिलेली आहे , माझी वैचारिक बुद्धी कळत नकळत वाढवून तिला खत पाणी घालणाऱ्या सर्वांना माझं पाहिलं पुस्तक विनम्रतेने अर्पण.

सुजाता सिद्ध

# रानाईची गढी !!!..

ही कादंबरी संपुर्णपणे काल्पनिक असून यातील स्थळे, व्यक्ती व नावे व घटना सर्व काल्पनिक आहेत. यातील कोणाचेही वास्तवाशी साधर्म्य आढळल्यास तो निव्वळ योगायोगच समजावा.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी फुलून आलेल्या सोनेरी गवतांच्या त्या आकर्षक माळांकडे देवयानी हरखून बघत होती, " जुन्नर इतकं सुंदर आहे माहिती नव्हतं मला सुहृद, पुण्याच्या इतक्या जवळ असून येणं झालं नाही रे कधी ", गाडी चालवताना एकदा सुहृदने तिच्याकडे कटाक्ष टाकला, सोनचाफ्या सारखी नितळ तेजस्वी पिवळसर अंगकांती, सुरई सारखी घाटदार दिसणारी उंच मान, त्यावरचा काळाभोर टपोरा तीळ, आणि तिरप्या नजरेने ती बाहेर बघत असतानाही दिसत असलेल्या, तिच्या घनदाट, लांबलचक पापण्या या सर्वांवरून मोठ्या प्रयत्नाने लक्ष काढून समोर वळवलं त्याने, " अष्टविनायक केलं असशीलच की कधीतरी "

"हो आले होते, पण खूप लहानपणी, आता एवढं आठवत नाही !. "

" लहानपणीच्या गोष्टी आठवत नाहीत तुला? मठ्ठच आहेस, मला बघ एकूण एक घटना आठवतेय लहानपणीची, i have very

sharp memory, you konw? " सुहृद ने गाडीच्या आरशात स्वतः:ची छबी न्याहाळत खुश होऊन म्हटलं.

“ अरे ssss मी एक वर्षाची होते त्यावेळी आईबाबा आले होते मला घेऊन कडेवर, कळलं? त्याला वेडावून दाखवत ती पुढे म्हणाली “ म्हणे, I have very sharp memory. म्हणून काल प्रॅक्टिकल च्या वेळेस विकेट उडाली होती वाटतं? देवी मला हे सांगतेस?, देवी मला ते सांगतेस? “.. आता कसा गप्प बसलास? आहे का आवाज काही? बोल की अं? “

"अगं ए ssssssss भांडोरी!.. भांडोरी आहेस तू एक नंबरची माहितीये का तुला? " सुहृद खदाखदा हसत म्हणाला.

" असू दे ! काय शब्द काढलाय भांडोरी म्हणे,, हं “ चेहेऱ्यावर रेंगाळणाऱ्या रेशमी बटा हातांनी सावरत, मानेला एक नाजूक झटका देऊन ती गाल फुगवून ती बाहेर बघत राहिली. सुहृद खुसुखुसु हसत राहिला,

अर्ध्या पाऊण तासानंतर दुरून काळ्याभोर घडीव दगडाचं अतिभव्य प्रवेशद्वार दिसायला लागलं तशी देवयानी सरसावून बसली, मुळचे मोठे असलेले डोळे कमालीच्या उत्सुकतेनं ताणून अजून मोठे करत ती उत्साहाने जवळजवळ ओरडलीच, “सुहृद...

आलं की रे अमरापूर ! लांबूनही कसली भारी दिसतेय तुमची गढी, i am so excited.... ”

चार एकरांच्या विस्तीर्ण परिसरात पसरलेली, ती गढी जशी जशी जवळ यायला लागली तशी तिची गूढता आणि भव्यता जास्तच नजरेत भरायला लागली, अमरापूरच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत अठराव्या शतकापासून अनेक विविध घडामोडी पाहत एखाद्या पुराण पुरूषा सारखी भक्कम पणे पाय रोवून उभी असलेली ती गढी. एखादा घोडेस्वार घोड्यावर बसूनच आत जाईल एवढ्या उंचीचं दगडी घडीव चिरेबंदी प्रवेशद्वार, त्याच्या कमानीवर कोरलेली कमळ पुष्प आणि शरभ शिल्पांची वेलबुट्टी म्हणजे म्हणजे शिल्पकलेचा अत्यन्त उत्कृष्ट नमुना होता. जवळपास वीस फुट उंच आणि सहा-सात फुट रुंद असलेली तटबंदी आणि तिच्या बाजूला आठ एक मोठे मोठे भक्कम बुरुज, आत दोन्ही बाजूला प्रशस्त दगडी देवड्या. प्रवेश द्वारापाशी पोहोचल्यावर त्याच्यावर असलेल्या रेखीव जाळयांच्या सुंदर गवाक्षांचं देवयानी थक्क होऊन निरीक्षण करत होती ते बघून दिंडी दरवाजातून आत शिरता शिरता सुहृद तिला म्हणाला, ” मॅडम चला आत, नंतर बघा निवांत, ते बघायलाच आला आहात आपण “

" My God !.. सुहृद तु इथे राहतोस? इथे???? "

उत्तरादाखल तो फक्त हसला, चल आत जाऊया, "" माँ वाट पाहत असतील आपली "

तितक्यात एका तांब्यात पाणी, भाकरतुकडा घेऊन, आरतीचं ताट घेऊन साधारण पन्नास-पंचावन्नच्या आसपास वय असलेली एक स्त्री लगबगीने समोरून येऊ लागली, गोरीपान, कपाळावर ठसठशीत कुंकू, नाकात टपोऱ्या पाणीदार मोत्यांची भली मोठी नथ घातलेली, पायातली जोडवी टचटचा वाजवत ती जवळजवळ पळतच येत होती. तिच्या मागोमाग आणखीही दोन गडी पळत आले, सुहृदने सामान काढण्यासाठी गाडीची चावी त्यांच्या हातात देत त्यांची विचारपूस केली, मग त्याने देवयानी ची त्या स्त्री शी ओळख करून दिली, "देवी या हौसाक्का, मला आईसारख्या आहेत, नमस्कार करतो हौसाक्का " बोलता बोलता तो वाकला, " आई म्हाळसाई माझ्या लेकराला उदंड आविष्य दे ग माय !.. " असं म्हणून हौसक्काने त्याच्या कपाळावरून बोटं फिरवून कडाकडा मोडली. "हौसाक्का हि देवयानी, माझी कॉलेजमधली मैत्रीण. " देवयानीने लागलीच हसून त्यांना नमस्कार केला, "या आत या !.. ". खाली ठेवलेला चांदीचा तांब्या आणि ताट

लगबगीने उचलण्याच्या नादात देवयानी कडे त्यांनी पाहिलंच नाही( की मुद्दाम दुर्लक्ष केलं ????... )

“ देवी, चल आत जाऊया, ‘माँ ‘वाट पहात असतील आपली “

तो आल्यामुळे गढीत एकंदरीत उत्साहाचं वातावरण पसरलं होतं, सगळ्या गडीमाणसांची लगबग सुरू होती, त्याच्याशी बोलायची सर्वांना ईच्छा होती, आणि तोहि आत जाता जाता सराईतपणे पूर्वीचे धनिक किंवा सरदार आपल्या नोकरांशी जसं अधिकाराने, जिव्हाळ्याने वागतात तसं वागत होता. देवयानी हे सगळं एकीकडे पाहत नवलाने पाहत त्याच्या मागे जात होती. प्रवेशद्वारातून आत वाड्याकडे जाईपर्यंतच्या मार्गात एक विस्तीर्ण चौक आणि त्याच्या बरोब्बर मध्यभागी उसळणारं अतिशय सुंदर कारंज,

“Woww … simply beautiful !.. ”

“हजारी कारंज आहे ते, i mean हजार पाकळयांचं !.. ” पुढे चालता चालता सुहृदने माहिती पुरवली, आत वाडयात जाईपर्यंतचा परिसर गर्द दाट वनराईने व्यापला होता. आंबा, वड, जांभूळ, पिंपळ, चिंच चालणाऱ्याच्या डोक्यावर छत्र चामरं ढाळत होती. त्यांच्या गार आणि दाट सावलीतून चालताना देवयानी मनात

विचार हे हे सगळं, आपल्याला नव्हतं माहिती सुहृद एका सरदार घराण्यातला आहे, त्यानेही सांगितलं तर नाहीच कधी आणि जाणवूनही दिलं नाही कधी. कॉलेजमध्ये आपण सगळे त्याची किती चेष्टा मस्करी करतो, त्याला कामाला लावतो, कसंही वागवतो, तोच का हा सुहृद?

गढीच्या आत प्रचंड मोठा दुमजली, चौसोपी वाडा होता. सर्वत्र भव्यता, समृद्धी आणि वैभवाच साम्राज्य होतं, जिथे बघू तिथे हंड्या, झुंबर, चांदीच्या मोठाल्या फुलदाण्या यांची अक्षरशः रेलचेल होती, कलात्मक रित्या सजवलेल्या असंख्य चांदिच्या वस्तू बघता बघता ती सुहृदच्या मागे अक्षरश: पळत होती, कारण त्याचं चालणं खूप झपाट्याचं होतं, खरं तर तिला प्रत्येक गोष्ट जवळून पाहायची होती पण सुहृद चं म्हणणं पडलं उद्यापासून निवांत बघ, त्याच मोहिमेवर आलो आहोत आपण. नुसता आतला वाडा बघायला चार दिवस जातील, ते हि खरंच आहे म्हणा, पण उत्सुकता तिला स्वस्थ बसून देत नव्हती, पण अति उत्सहाच्या भरात चुकून आपण कुठे रेंगाळलो तर या प्रचंड वास्तूत हरवून जाऊ, म्हणून शक्यतो ती त्याच्या मागे मागे रहात होती, अनेक दालनं पार करून ती दोघे एका प्रशस्त महालवजा खोलीत आली.

“या SSSSS “ समोर सुहृदच्या मातोश्री उभ्या होत्या.

सरदारांच्या रूबाबाबाला साजेसा साजशृंगार केलेल्या सुहृदच्या मातोश्री अत्यंत तरुण आणि देखण्या होत्या जेमतेम तिशीच्या वाटतील अशा. देवयानी विचारात पडली, तेवढ्या सेकंदात तिच्या मनात अनेक प्रश्न येऊन गेले ' एवढ्या लहान कशा दिसतात या? हि सुहृदची खरी आई असेल ना? की सावत्र?, की संतूर मम्मी? सुहृदने ओळख करून दिली तशा त्या किंचित हसल्या, मनात आलेले असंख्य प्रश्न झटकून तीही मग आदब दाखवूनच हसली, " अरे तुम्ही सहा -सात जण येणार होतात ना?".. बाईंच्या आवाजात खानदानी जरब आणि आदब होती.

" हो माँ, आमचा अख्खा ग्रुप येणार होता पण बाकीच्यांचं ऐनवेळेस पोस्टपोन झालं, अजून दोन -तीन दिवस लागतील त्यांना यायला, फक्त ही देवयानी आधी आली, कारण ही होस्टेल वर राहते ना, इथून तशीच तिच्या घरी पुण्याला जाणार होती म्हणून होस्टेल सोडून आली होती. मग मीच तिला म्हणालो कि तू माझ्याबरोबर चल ... "

"""बरं कंठाजीराव आता फ्रेश व्हा, आणि लगोलग जेवणघरात या, आणि हो या सगळयांसाठी वाड्याच्या मागच्या बाजूच्या खोल्या आहेत ना, त्या आवरून ठेवायला सांगितल्या

होत्या मी बाबू ला आणि शिवराम ला, यांना त्यातलीच एक खोली द्यायला सांगतो आम्ही हौसक्काना. ”

“जी माँ “ सुहृद अगदी अदबीने खाली वाकत म्हणाला,

ते दोघे खोलीच्या बाहेर पडले, “काय म्हणाल्या त्या तुला? कंठाजीराव?” खळखळून हसत देवयानी विचारत होती, तोच समोर हौसाक्का उभ्या राहिलेल्या दिसल्या, देवयानीकडे बघत म्हणाल्या “चला ताई खोली दाखवते तुम्हास्नी,” त्यांच्या आवाजात एकप्रकारची हुकूमत होती. तिला तो स्वर मुळीच आवडला नाही. तिच्या मनात येऊन गेलं.. लगेच काय खोलीत जायचं? अजून काही पाहिलंच नाहीये, तेवढ्यात सुहृदही लगेच पलीकडच्या बाजूने निघून गेला, तिला आश्चर्य वाटलं, ‘जाताना सांगायचं तरी याने निदान ‘

“बाकीची समदी मंडळी कवा येणार हायती?” जोडवे वाजवत चालताना हौसक्कानी तिला विचारलं

“येतील चार -पाच दिवसात” खरं तर तिला खूप प्रश्न पडले होते, पण हौसक्काविषयी तिचे प्रथमदर्शनी मत काही चांगलं झालं नव्हतं, त्यामुळे लगेच काही अघळपघळ बोलायला नको त्यांच्याशी असा विचार करून ती त्यांच्या मागे गप्प चालत निघाली, थोड्याच वेळात त्या दोघी वाडयाच्या पाठीमागच्या

बाजूला पोहोचल्या, तिथून जेवढी लांबवर नजर जाईल तिथपर्यँत फक्त हिरवंगार मैदान दिसत होतं, तिने आत येताना पाहिलेले बुरूजही दिसत नव्हते, खूप लांबवर असतील कदाचित, वरून दिसतील तिला वाटलं, गोल गोल लांबलचक दगडी जिना चढून दोघी वरच्या मजल्यावर आल्या, वरती प्रशस्त सज्जा होता, त्याच्या आवारात भला मोठ्ठा झोपाळा, त्यावर पांढरीशुभ्र बैठक, त्यावर त्याच रंगाचे दोन लोड, त्याच्यासमोर शोभिवंत, पितळी पानाच्या डब्याचा साज लेऊन बसलेला एक शिसवीच्या लाकडाचा टेबल, आणि एकमेकांना लागून असंख्य मोठं मोठ्या खोल्या, त्यातली कडेची खोली उघडत हौसाक्का तिला म्हणाल्या, ’’’ताई सगळी आपलीच प्रॉपर्टी हाय, समदीकडं आपले पहारेकरी हैत, भ्यायचं कायबी कारन नाय, कोनीबी कायबी करनार न्हाय तुम्हास्नी, बिनघोर ऱ्हावा’’

“मी कधी म्हटलं मी घाबरले?” तिने हौसाक्का ला प्रतिप्रश्न केला.

“ तसं न्हाई, मघाशी कंठाजी सरदार पलीकड एकलंच निघून गेले तवा म्या बघितलं, तुम्हाला एकदम भ्या वाटलं, म्हनून आपलं सांगिटलेलं बरं. ”

“ हिचं बरं लक्ष माझ्याकडे,” देवयानी मनात म्हणाली. आणि काहीच न बोलता खोलीचं निरीक्षण करण्यात गुंतली. खोली स्वच्छ आणि नीटनेटकी लावून ठेवली होती, तिचा पुण्यातला ३ बेडरूमचा प्रशस्त फ्लॅट अख्खा बाल्कनीसकट मावला असता त्यात, एवढी मोठी. त्याला साजेल असा वॉर्डरोब, आणि, सुंदर नक्षीचा आरसा असलेला पुरातन शिसवीच्या लाकडाचा ड्रेसिंग टेबल. तसाच अगदी त्याला मॅचिंग उंच आणि अतिभव्य बेड, शिवाय आता हे हौसक्काचं डोकं होतं कि आणखी कुणाचं माहिती नाही पण वर चढायला म्हणून बेडच्या खालीच एक छोटासा बसका स्टूलही होता.

“ताई आवरून खाली जेवणघरात या, तुम्हाला घ्यायला मी ‘मुकीला ‘ पाठवते धा मिनिटांत, मुकी म्हणजे माझी धाकली लेक, तिला बोलता येत न्हाई, म्हून मुकीच नाव पडलं बघा तिचं”

“आई गं !.. बिचारी … देवयानीच्या तोंडातून नकळत सहानुभूतीचे स्वर निघाले.

“या आवरून !..” हौसाक्का गेल्या, जाताना दार लावून गेल्या, ती हि मग उठली, तिचं सामान आधीच आणून नीट नेटकं लावून ठेवलेलं होतं, बॅग उघडून तिने वरच्यावर असलेला टॉवेल, साबण वैगेरे साहित्य काढलं आणि ती बाथरूम मध्ये जायला आत

वळली, तोच एका स्त्रीची एकदम एक जीवघेणी किंकाळी तिला ऐकू आली, आणि तिचे पाय जागच्या जागीच थबकले !!!... एक क्षण सावरून मग धावत ती दरवाजापाशी गेली, आणि दार उघडून बाहेर पाहू लागली, बाहेर सगळं निपचित !.. धडधडत्या अंत:करणाने तिने आवाज कुठल्या दिशेने आला याचा अंदाज घ्यायला सुरूवात केली, पण तिला तो लावता येईना, पाच - दहा मिनिटे गेली, नकळत तिचं मन परत काही ऐकू येतयं का यासाठी कानोसा घेऊ लागलं, पण नंतर काही आवाज आला नाही, थोडंसं गंभीर होऊन मग तिने सुहृद ला फोन लावायचा प्रयत्न केला, पण मोबाईलला रेंज नव्हती, ती अस्वस्थ झाली, आपण लगेच त्याला भेटून सोक्षमोक्ष लावूया असं ठरवून दार लावून ती आत बाथरूम मध्ये गेली, आत अगदी पुरातन काळी असायचं त्यापद्धतीचं तांब्याचं घंगाळ होतं. एक गार पाण्याचा, आणि एक गरम पाण्याचा नक्षीदार पितळी नळ, वाळा -चंदन मिश्रित साबण, आणि कितीतरी आकर्षक गोष्टी ज्या एरवी देवयानी ला खूप आवडल्या असत्या, पण आत्ता नुकत्याच ऐकलेल्या किंकाळीने ती काहीशी अस्वस्थ झाली होती. बाथ घेऊन फ्रेश झाल्यावर तिला जरा बरं वाटलं, आरशा समोर आवरत असतानाच दारावर थाप पडली. तिने पटकन जाऊन दरवाजा उघडला, तर समोर कोणीच नव्हतं. दरवाजा तसाच उघडा ठेऊन ती उभी राहिली. ‘या अवाढव्य वास्तूच्या मागच्या

बाजूला जिथे कोणाचाही वावर नाही अशा ठिकाणी आपण राहतोय ‘ या विचारांनी क्षणभर तिला भय वाटून गेलं,

तेवढ्यात ‘हॉ !..” असा आवाज काढून कुणीतरी एकदम खळखळून हसलं, देवयानीने बाहेर डोकावून पाहिलं, दाराच्या मागे १०-११ वर्षांची एक चिमुरडी तोंडावर हात ठेऊन खुदुखुदू हसत उभी होती. तिला पाहताच देवयानीच्या चेहऱ्यावर हसू फुटलं, “अय्या तू? घाबरले ना मी ….”

तिचा तो अभिनय बघून ती छोटी मुलगी खूष झाली आणि टाळ्या वाजवत हसली.

“ये आत” देवयानीने प्रेमाने तिला आत घेत म्हणाली “तुझी आई म्हणाली कि तुझं नाव मुकी आहे, पण मला नाही आवडलं हे नाव, कसली क्युट दिसतेस तु मी तुला सोना म्हणू?”

मुकीने ‘हो ‘ अशा अविर्भावात या टोकापासून त्या टोकापर्यंत मान डोलावली.

“गुड गल” हाय फाईव्ह दे !..

मग देवयानी ने तिला हाय फाईव्ह द्यायला शिकवलं आणि त्या दोघी रमतगमत जेवणघरात पोहोचल्या.

तिला तिथे सोडून मुकी खेळायला निघून गेली, गडी माणसं आजुबाजुला फिरत होती, ती सुहृदची पाहुणी होती म्हणूनही

असेल तिच्याकडे बघायला देखील सगळे बिचकत होते, मग ती आजूबाजूचं निरीक्षण करण्यात गुंतली, टेबलवर अनेक पदार्थांची रेलचेल होतीच पण बाजुच्या कोनाड्यांमधून मोठाल्या जड चांदीच्या थाळयांमध्ये निरनिराळे फळफळावळ भरून ठेवले होते, प्रत्येक वस्तू जुन्या काळातल्या चांदीने बनवली असावी, ती ज्या टेबलवर बसली होती त्याची कडाही चांदीचीच. हे सगळं बघून झाल्यावर ती सुहृदची वाट बघत बसली, असं खूप वेळ एकटं बसायचा तिला कंटाळा आला, भूकही प्रचंड लागली होती, नानाविविध पदार्थांचा खमंग वास सुटला होता, ती आत स्वयंपाक घरात डोकावून बघायच्या विचाराने उठली तोच आतून पारंपारिक वेषात एक नोकर भली मोठी थाळी हातात घेऊन आला. आणि मोठ्या अदबीने तिच्यापुढे ठेऊन वेगाने निघून गेला. शाही भोजन असावं तसं सगळं पान भरगच्चं वाढलेलं होतं, वरच्या बाजूला मध्यभागी मीठ, डाव्या बाजूला निरनिराळया चटण्या, चार -पाच कोशिंबिरी, लोणची, पापड, भजी, कुरडया, खीर आणि पुरण. उजव्या बाजूला तोंडली, मटार -बटाट्याची भाजी, भरलं वांगं, सांबार, पानाच्या मध्यभागी पोळया, पुऱ्या, वाटल्या डाळीचे कढीवडे, कोथिंबीर वडी, कोबीची वडी, मठ्ठा, २ प्रकारच्या खिरी (शेवयाची आणि गव्हल्याची), पुरण पोळया, शेजारी घीवर, आमरस, श्रीखंड, बासुंदी, साखरभात, जिलबी, लाडू, पुरणपोळी,

केशरपाण्याची एक छोटी चांदीची नक्षीदार वाटीही होती पानात, ( असं म्हणायचे कि पेशवाईच्या काळात ही पध्द्त होती, एक पक्वान्न खाल्ल्यावर त्याची चव दुसऱ्या पक्वान्नाला लागू नये म्हणून त्यात आधी बोटं बुडवायची हे तिला वाचून माहिती होतं ), बेत तर एकदम शाही आहे, एवढं सगळं खायला मला दोन तीन दिवस लागतील, डाएट चा धुव्वा !... ती स्वतः:शीच उद्गारली" पण हा सुहृद येणार आहे कि नाही?" कंटाळून तिने पुन्हा फोन हातात घेतला, त्याला रेंज नव्हती. तिने इकडे तिकड़े बघितलं, एक नोकर हातात काही सामान घेऊन बाहेर जाताना दिसला त्याला तिने बोलावून घेतलं. "इथे कोणीच आलं नाहीये का? जेवायला मी एकटीच आहे का? सुहृद कुठे आहे, त्याच्या माँ पण दिसत नाहीयेत."

तो काहीच न उत्तरता तिच्याकडे मख्ख चेहेऱ्याने पहात राहिला. "अहो मी तुमच्याशी बोलतेय, हौसाक्का कुठे आहेत?" तितक्यात समोरून हौसक्का आल्या. " हे काय ताई जेवायला सुरूवात न्हाई केली अजून?"

" अहो पण मी एकटीच ? सुहृद कुठे आहे?त्याच्या घरातलं कोणीच नाही जेवायला?"

" कंठाजीरावांचं डोकं दुखतया, आन वहिनी सरकारांची आज एकादशी हाये, त्या फकस्त ज्यूस घेतात. तुम्ही जेवा बिनघोर, अन ताई हिथं सरदारास्नी कंठाजी राव म्हनत्यात, त्या बिगर बाकी कोनतं बी नाव कोनाला ठावं न्हाई तवा गडी मानसाला काई इचारू नका, उत्तरं देनार न्हाई कोनीबी." एकतर आपण त्या नोकराशी बोलत असताना ह्या बाईने कसं ऐकलं? इथे ती नव्हतीच, त्यातून असं सडेतोड बोलणं, याचा तिला राग आला आणि मुळात असं एकटं जेवायला बसवलेलंही तिला आवडलं नाही, समोरच्या वाढलेल्या पानाला नमस्कार करून ती उठली. "हौसाक्का मला भूक नाहीये, मला जरा प्लिज सुहृदची रूम दाखवा. "

"आवं ताई हे काय? भरल्या पानावरुन असं उठावं का? जेवा बरं मुकाट्यानं, नाहीतर पावन्यास्नी उपाशी ठेवलं म्हनून वहिनी सरकार रागावतील."

"हौसाक्का सुहृदची रूम कुठे आहे प्लिज सांगा"

" सरदार झोपले असताना आमी कुनीबी तिथं जात न्हाई".. एव्हना हौसाक्का अतिशय डॅम्बीस आहे, हे देवयानीला कळून चुकलं. आलेला राग मनातच गिळून, तिने म्हटले, "ठीक आहे, तो उठला कि त्याला ताबडतोब माझ्या रूमवर पाठवा. आणि" इथे

मोबाईलला रेंज कुठेच येत नाही का? लँडलाईन वैगेरे कुठे असतो ? मला जरा घरी फोन करायचा आहे.”

“ करा की सावकाश, काय घाई येवढी? अदुगर आराम करा जरा, ”

“ इथे सगळं तुमच्यावरच सोपवलंय का?” कपाळावर आठ्या चढवून देवयानी तरातरा जेवणघराच्या बाहेर आली आणि अंदाजानेच उजव्या बाजूला निघाली, सकाळी येताना ज्या दिशेला तिने माँ ची रूम पाहिली होती त्या बाजूला ती जाऊ लागली. हौसाक्का तिच्या मागून पळत आल्या, “ताई असं कुटबी फिरू नका, त्यो रस्ता वहिनी सरकारांच्या महाला कड जात न्हाई, तुमाला रस्ते ठावं न्हाईत, चुकला तर हिथं तुम्हाला माझ्या बिगर कोनी ओळखत बी न्हाई. सरळ उचलून खाली टाकतील तळघरात”

“असं पण आहे का? पाहुण्यांना बोलावतात कशाला मग तुमचे सरदार?तळघरांत टाकायला? कुठल्या शतकात वावरतात तुमची सरदार मंडळी? तुम्ही एक काम करता का हौसाक्का?, मला बाहेर जायचा रस्ता दाखवा, मी घरीच जावं म्हणते इथून आता”

“अवो ताई एकदम असं रागावू नका, माज़ काही चुकलं असलं तर माफी करा, गढीतले नियम आनी बाहेरचे नियम येगळे

आहेत. म्हनून जरा सावध क्येलं एवढंच, कंठाजी राव उठले की लगोलग मी सांगावा धाडतेच ”

तितक्यात लाल रंगाचं मखमली छत्र डोक्यावर दोन जणांनी धरलेलं अशी माँ साहेबांची स्वारी येताना देवयानीला दिसली, जवळ येता येता त्यांनी विचारलं, “ भोजन आवडलं का देवयानी तुम्हाला? इथे फक्त पारंपारिकच जेवण असतं हं, आणि माफ करा तुमच्या बरोबर पंगतीला कोणी नव्हतं आज, काय आहे ना, कंठाजीराव डोकेदुखी ने त्रस्त आहेत, त्यांचे वडिल बंधू आपल्या पिताजींसोबत फॅक्टरीच्या कामासाठी गावी गेले आहेत आणि आमच्या कन्या आपल्या आजोळी गेल्या आहेत गिरवली ला, हौसक्काकांकडे सांगावा धाडला होता मी तसा” त्यांच्या आपुलकीच्या शब्दांनी तापलेली देवयानी जरा शांत झाली. चेहेऱ्यावर सौम्य हसू आणत ती उत्तरली,

“नाही मला भूक नव्हती फारशी, मी रात्री तुमच्याबरोबर खाईन. पण आत्ता तुम्ही या बाजूने कशा आलात? i mean तुमची रूम उजव्या बाजूला आहे ना?

“ हाहाहाहा फसलात ना तुम्ही पण? अहो इथे भुलभुलैय्या आहे सगळा. दिशा ज्ञान होत नाही पटकन. पूर्वीचं स्थापत्य शास्त्रच असं जबरदस्त आहे, शत्रूला हुलकावणी द्यायला, बांधलंय अशा

पद्धतीने की नवीन माणसाला कुठून आलो, कुठे गेलो समजत नाही.”

“ओह, मग सध्या तरी तुम्ही मला एक गाईड दिला पाहिजे. ”

“अलबत, म्हणून तर हौसाक्का आणि मुकी दोघीना तुमच्याच तर दिमतीला ठेवलंय”

“हो पण हौसाक्का इतर कामात व्यस्त असतात”

“अहो पण मुकी आहे की, तिला बोलता येत नाही म्हणून तुम्हाला वाटलं असेल, पण ती भयकंर हुशार आहे. गढीतले जवळजवळ सगळे रस्ते तिला ठाऊक आहेत”

“ मला फोनही करायचा होता माझ्या घरी मी इकडे सुखरूप पोहोचल्याचा, घरी आई बाबा काळजीत असतील.”

“हौसाक्का, तुम्ही रूम मध्ये यांना कनेक्शन द्यायला सांगितलं नाही का? आनंदाला बोलावून आजच्या आज ते काम करून टाका, कंठाजीरावांच्या पाहुण्यांकडून काहीही तक्रार येता कामा नये, बाकीची दोन -चार कामं कमी करा. बरं देवयानी, तुम्ही जेवला नाहीत तर निदान आमच्या बरोबर फळांचा रस घ्या, आणि आपल्या आमराईतल्या आंब्यांची चव बघा, बाकी सगळे आंबे विसरून जाल”. पायात घोळणाऱ्या आपल्या डाळिंबी रंगाच्या रेशमी शालूच्या निऱ्या किंचित वर उचलत, पुढे चालता चालता

त्यांनी आर्जवाने म्हटलं "अं?... हो घेते" जेवणघरातून फळांचा रस घेऊन ती मुकी बरोबर बाहेर पडली, "सोना तुला मॅप म्हणजे काय माहिती आहे?" नाही अशा अर्थाने सोनाने मान हलवली.

"मॅप म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचं असेल तर तो रस्ता आणि त्या मार्गावरच्या खाणाखुणा याचं चित्र. तुला चित्र काढायला आवडतात?"

सोनाने खुशीने होकारार्थी मान हलवली.

"मग चल माझ्या रूमवर, तुला देते साहित्य, शाळेत जातेस?कितवीला आहेस?"

सोनाने नाही अशा अर्थाने मान हलवली.

दोघी रूम वर आल्या, तो तिच्या इथे टेलिफोन कनेक्शन देण्याचं काम चाललं होतं, हौसाक्का कंबरेवर हात ठेऊन जातीने उभ्या होत्या. तिला बघून त्या म्हणाल्या," वायरी व्हत्याच हितपर्यंत आणलेल्या, फकस्त जोडण्याचं काम करतुया तो, लगेच व्हईल, थांबा वाईच. आन बाह्येरचा लंबर 1लावायचा आसल तर झिरो लावून डायल करा" यावर ती काहीच बोलली नाही. त्यांचं होईपर्यंत खिडकी जवळच्या कट्टयावर बसून बाहेरचं निरीक्षण करत राहिली. समोरच्या लांबलचक मैदानात हिरवळीवरून दोन घोडेस्वार दौडत येताना तिला दिसत होते, ते जवळ येताच

वाड्यातून दोन -तीन नोकर पळत बाहेर येऊन त्यांच्या हातात काही वस्तू होत्या त्या देऊन पुन्हा घाईघाईने वाड्यात गेले, आलेले घोडेस्वार पुढे वळून जंगलाच्या दिशेने निघून गेले.

“हॅलो आई.. ”

“हॅलो, देवी अगं फोन लागत नाहीये बाळा तुझा, पोहोचलीस का तू अमरापूरला सुखरूप?”

“ हो आई, पोहोचले, बाबांना फोन देतेस का जरा?”

“देते, पण आधी माझ्याशी बोल की, दुपारी जेवण झालं का नीट? शाही खाना होता का गं, सरदार लोकं काय खातात गं? आपल्यासारखंच खातात की अजून काही?”

“आई अगं सांगते, ? तू आधी बाबांना दे बरं फोन, मला जरा महत्वाचं बोलायचंय त्यांच्याशी”

“बरं थांब देते, हे घ्या हो, बोला तिच्याशी, काहीतरी महत्वाचं सांगायचं म्हणतेय..”

“ हॅलो बाबा, ‘सारंग, निलेश आणि ऋता, मैत्रयी यांचे नंबर आहेत ना तुमच्या मोबाईल मध्ये,”

“आहेत की, का गं?”

“बाबा इथून ना रेंज मिळत नाही, जरा प्लिज त्यांच्याशी बोलून मला कळवा ना, ते लवकर येऊ शकतील का इकडे ?”

“बरं कळवतो, काय झालं बंड्या ? एवढ्यात कंटाळलीस? तिथे सगळं ठीक आहे ना?”

“ अ? हो, खरं म्हणजे कळत नाही काही, ठीक आहे कि नाही. ”

“म्हणजे?”

“म्हणजे सकाळी मी आले ना, तेव्हापासून एकतर सुहृद मला भेटलाच नाहीये, इकडे पोहोचल्यानंतर डोकेदुखीचं निमित्त करून तो जो त्याच्या रूम वर गेला परत आलाच नाहीये. ”

“हात्तीच्या एवढंच होय? मला वाटलं काय झालं.. ”

“तसं नव्हे बाबा, अजुन एक गोष्ट म्हणजे आल्यानंतर मी रूम मध्ये आवरत असताना मला एक जोरदार किं.. …”

खट दिशी आवाज होऊन फोन डिस्कनेक्ट झाला, देवयानीने चमकून पाहिलं, तर तो फोन सोनाने डिस्कनेक्ट केला होता,. तेवढं करून झाल्यावर ती पुन्हा देवयानीने दिलेलं पेन आणि कागद घेऊन चित्र काढत बसली. देवयानी तिच्या जवळ गेली, “सोना असं का केलंस तू बाळा? फोन डिस्कनेक्ट का केलास गं?” यावर सोनाने काही प्रतिक्रिया दिली नाही, शांतपणे चित्र काढत राहिली, देवयानी

परत काही बोलणार तोच तिचं लक्ष सोना काढत होती त्या चित्राकडे गेलं आणि तिचे पुढचे शब्द ओठातच विरले. शहारून तिने ते चित्र हातात घेतलं, केस मोकळे सोडलेली, दात विचकलेले अशा एक भेसूर स्त्रीचं ते चित्र होतं, लहान १० वर्षाच्या मुलाला जसं काढता येईल तसं, रेघोट्या मारून काढलेलं !!!... सुन्न झालेली देवयानी किती वेळ तशीच उभी राहिली.

रात्रीचं जेवण देवयानीने खोलीतच मागवून घेतलं, ती ज्या उत्सहाने सकाळी गढीत आली होती, तो उत्साह आता पूर्ण मावळून गेला होता . सुहृदच्या वागण्याचा तिला राग आला होता, केवळ त्याच्या भरवशावर या अनोळखी जागेत ती आली होती आणि आल्यापासून तिला असं गडीमाणसांच्या भरवशावर टाकून तो बेपत्ता झाला होता. आपण तिकडे जेवणघरात गेलो नाही तर तो निदान चौकशी करायला म्हणून तरी येईल हा तिचा अंदाज फोल ठरला. तिच्या सोबतीला म्हणून राहिलेली सोना केव्हाच झोपी गेली होती, देवयानी मात्र जागीच होती, दिवसभराच्या घटनांचं विचारचक्र तिच्या डोक्यात चालू होतं, त्यात एक गोष्ट तिच्या लक्षात आली ते म्हणजे संध्याकाळी बाबांशी फोन वर बोलताना सोनाने बरोब्बर महत्वाचं सांगत असताना फोन कट केला, म्हणजे

तिला हि गोष्ट माहितीये आणि आपण ती बाबांना सांगू नये अशी तिची ईच्छा होती, पण का? बाहेर गढीबद्दल काही वाईट पसरू नये ही काळजी तिने घेतली का? पण तेवढं कळण्याइतकं तिचं वय नक्कीच नाही, मग दुसरं काय? इथून आपण बोललेलं दुसरं कोणी ऐकत असेल का?.. कोणी म्हणजे हौसक्का वैगेरे? आणि हे सोनाला माहिती असेल? …??.. या विचारसरशी दचकून ती उठून बसली. थोडा वेळ शांत बसून राहिली, मग तिच्या मनाने एक सुज्ञ विचार केला, इथे काही का असेना आपण विचार करून डोकं का शिणवतोय उगाच? तसंही काही धोकादायक वाटलं तर आपल्याला आपल्या घरी जायचा पर्याय आहेच की. घड्याळात पाहिलं तर आत्ताशी कुठे आठ- साडे आठच झाले होते, एवढ्या लवकर झोपल्यावर पुन्हा मध्येच जाग यायची, त्यापेक्षा जवळच एक चक्कर मारून यावी असा विचार करून, शाल पांघरून, देवयानी खाली आली. दूरपर्यँत मिट्ट काळोख आणि रातकिड्यांची किरकिर, मध्ये मध्ये पलिते दिसत होते, तसेच दिव्याचे खांबही, ‘जागते राहो sssss” अशी आरोळीही मधून मधून ऐकू येत होती. अगदी मध्यरात्र झाल्याचा भास होत होता, तिच्या खोलीच्या खिडकी जवळच एक गुलमोहोराचं झाड होतं त्याची खूण तिने लक्षात ठेवली, आणि खोली दृष्टीपथात राहील एवढं लक्षात ठेवून ती निघाली, गार वाऱ्यवर आल्यावर तिला जरा बरं वाटलं, चार

पावलं चालली असेल नसेल तोच ती, काळीज चिरत जाणारी भयानक किंकाळी पुन्हा तिच्या कानावर आदळली. या वेळेला तिला आवाजाची दिशा कळाली, अंधारातूनही चन्द्राच्या क्षीण प्रकाशात गूढ वाटणाऱ्या जंगलाच्या दिशेने तो आवाज आला होता, कोणी स्त्री संकटात असेल तर तिला मदत केली पाहिजे या विचारसरशी, तिने पावलांचा वेग वाढवला आणि जवळजवळ पळतच ती निघाली. उंच उभ्या झाडांमधून तसं वाट काढणं कठीण नव्हतं, पण काळोख सोडला तर दृष्टीपथात काहीही येत नव्हतं. किती तरी वेळ ती अर्धवट चालत अर्धवट पळत राहिली, आत आत किती आत आली कोण जाणे, बराच वेळ झाला काही गवसलं नाही, थकून परत फिरावं असा विचार करून ती वळली आणि त्याच वेळी ती किंकाळी पुन्हा एकदा तिला ऐकू आली, यावेळेस अगदी जवळून, तिच्या डाव्या बाजूने, आता देवयानी डाव्या बाजूला वळली, पण एव्हाना तिच्या लक्षात आलं की दिसत काहीच नाहीये फक्त आवाज येतोय बास, आवाजच्या आधारावर असं किती पुढे जाणार, ?, त्यापेक्षा परत फिरावं, उद्या आपल्या आपल्या घरी निघून जावं, infact बाकीच्या चौघाना फोन करून सांगावं की येऊ नका, काहीतरी ‘Fishy ‘आहे इथे !!!.

आलेल्या दिशेने ती वाड्याकडे निघाली, पण काही वेळ चालत राहिल्यानंतर तिच्या लक्षात आलं की आपण परत परत

तिथेच येतोय, मघाशी दिसलेलं छोटं काटेरी झुडूप, त्याच्या काट्यांमध्ये देवयानीच्या शालीचं टोक अडकलं होतं, आताही ते परत तसंच अडकलं, एका झाडावर क्षीण झालेल्या चंद्रप्रकाशात एक पांढरी आकृती कोरलेली होती तीही तिला पुन्हा दिसली, त्याच त्याच गोष्टी तिला पुन्हा पुन्हा दिसू लागल्या आणि ती हबकली ! तेव्हा पाहिलं नव्हतं पण आता शक्य होईल तितक्या निरखून तिने ती आकृती पाहिली आणि तिच्या अंगावर सरसरून शहारा आला, त्या आकृतीमध्ये एक स्त्री दिसत होती, केस मोकळे सोडलेली, दात विचकून भेसूर हसणारी, अगदी सोनाने चित्रात काढली तशीच!!!!... कधीही कशालाही न घाबरणाऱ्या देवयानीच्या पोटात आता मात्र भीतीने खड्डा पडला, आपण जितके स्वतः:ला सुरक्षित समजतो तितके आहोत का? गढीवर पहारेकरी असले तरी आपल्याला आत्ता या क्षणी त्यांचा सरंक्षणासाठी उपयोग आहे का? जर इथेच आपल्याला काही झालं तर कोणाला कळणार आहे? आई बाबा कुठवर धडपड करतील? सारंग, निलेश, ऋता ह्याचा कितपत पाठपुरावा करतील?, आणि जर आपण रात्रभर इथेच या भयाण जंगलाच्या चकव्यात सापडलो तर? या कल्पनेने पोटातला खड्डा अजून वाढत चालला . त्याच झाडाला टेकून ती मट्कन खाली बसली, गुडघ्यात मान खुपसून.

किती वेळ गेला माहिती नाही, अर्धवट झोपेच्या गुंगीत तिला कोणीतरी हलवत होतं, आधीच घाबरलेली देवयानी जोरात किंचाळली आणि तिने डोळे उघडले, तो सोना तिला हलवून उठवत होती आणि देवयानी चक्क खोलीत बेडवर होती, "मी इथे कशी काय? मला कोणी आणलं इथे? सोना तू ? तु पाहिलंस मला जंगलात... ? " तिने सोनाला विचारल, पण सोना तिला उठवून परत झोपी गेली होती, देवयानीने घड्याळात बघितलं पहाटेचे पाच वाजले होते. हे स्वप्न होतं तर हुश्श !.... कीती घाबरलो आपण, एवढ्या थंडीतही ती घामाने निथळत होती, पण स्वप्न इतकं खरं असू शकतं? तिला काही केल्या ते स्वप्न होतं यावर विश्वास बसेना, ती जंगलात गेली होती तिला चांगलं आठवत होतं, मग ती पुन्हा इथे कशी आली? विचार करता करता ती पुन्हा निद्राधीन झाली.

सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने आणि खोलीत प्रवेश केलेल्या कोवळया उबदार सूर्यकिरणांनी तिला जाग आली, उठून, फ्रेश होऊन, आवरून ती आणि सोना ब्रेकफास्ट साठी बाहेर पडल्या, सगळीकडे हिरव्यागार मैदानावर दवबिंदू चमकत होते, मोत्यासारखे, नव्हे- नव्हे लखलखीत हिरे कोणीतरी मूठ मूठ उधळून टाकले असावे तसे, आणि त्यातच अधूनमधून पांढरी शेवंती आणि रंगेबिरंगी गुलाबांचे रंगेबिरंगी ताटवे सूर्यप्रकाशात मुक्तपणे डोलत होते, त्या अनुपम निसर्ग सौंदर्याने देवयानीच्या मनातली रात्रीची

सगळी जळमटं धुवून काढली. आणि प्रसन्न मनाने तीने जेवणघरात प्रवेश केला, आज टेबलवर काही लोकं आधीच बसलेली दिसली, मुख्य खुर्चीवर एक रुबाबदार गृहस्थ बसले होते ते बहुधा थोरले सरदार असावेत, त्यांच्या डाव्या बाजूला सुहृदच्या माँ, आणि उजव्या बाजूला त्यांच्यासारखाच देखणा, खानदानी रूबाब असलेला, उंचापुरा असा एक तरुण बसला होता तो कदाचित सुहृदचा मोठा भाऊ असावा, त्याच्या शेजारी देवयानीच्याच वयाची एक सुंदर मुलगी बसली होती, ती सुहृदची बहीण असावी, आणि तिच्या पलीकडे, हुश्श.. अखेर कालपासून गायब झालेला, सुहृद दिसला !..

माँ नी तिला आपल्या जवळ बसवून घेत सर्वांची ओळख करून दिली, नाश्त्या मध्ये बरेच पदार्थ होते, कालपासून देवयांनीच खाण्याकडे लक्षच नव्हतं, आज मात्र तिने मनसोक्त ब्रेकफास्ट केला, तसे सर्वच पदार्थ अतिशय चवदार होते. पण नारळाच्या दुधात केलेल्या आणि केळीच्या पानात गुंडाळून वरून लोणी सोडून शॅलो फ्राय केलेल्या पानग्या, तिला विशेष आवडल्या. गप्पा मारताना कळालं की ही सगळी मंडळी पहाटेसच आली होती. सरदार घराण्याचा आब राखून बोलत असले तरी बऱ्यापैकी मोकळेपणाने बोलले सर्व, वसुंधरा देवी म्हणजे सुहृदची बहीण, तिने आपण होऊन सगळी गढी दाखवायचं देवयानीला कबूल केलं

आणि देवयानी खूष झाली. खाल्ल्यावर त्या दोघी लगेचच निघाल्या त्यामुळे सुहृद शी तिला बोलायला जमलं नाही, तसंही तो अजून मान खाली घालूनच खात होता, हौसाक्का त्याच्या शेजारी उभ्या राहून त्याला हवं नको पाहत होत्या, त्याच्याकडे पहाताना तिला उगाच असं वाटून गेलं की तो कोणत्या तरी खूप मोठ्या दडपणाखाली आहे.

" चला देवयानी, निघूया आपण, मुके आज तुला सुट्टी " वसुंधरा सोनाला म्हणाली तशी सोना उड्या मारत आत पाकगृहात निघून गेली. तिच्याकडे बघताना देवयानीच्या मनात विचार आला एवढी लहानगी पोर, मात्र एकदाही आईजवळ लाडाने जाताना दिसली नाही, " Strange !.. "

"अं ? काही म्हणालात देवयानी ?.. "

" काही नाही, निघायचं आपण? आणि प्लिज तु मला अहो जाहो म्हणू नकोस, आपण जवळजवळ एकाच वयाच्या आहोत "

"Oh yes !.. सॉरी, अगं सरदारांचे रीतिरिवाज माँ नी इतके अंगात भिनवले आहेत ना, की काही विचारू नकोस, " दोघी एव्हाना जेवणाघरातून बाहेर पडून एका अरुंद जिन्यातून वर निघाल्या, घडीव दगडाच्या त्या मोठाल्या पायऱ्या बऱ्यापैकी अंधाऱ्या आणि गोल गोल होत्या, कुतुबमिनार सारख्या, अजून

असेच वर वर जात राहिलो तर आपल्याला चक्कर येईल असं वाटत असतानाच, त्या वरच्या मजल्यावरच्या खोलीत पोहोचल्या. "woww.. !.. आपण तर चक्क खोलीत पोहोचलो, मस्तच गं " यावर वसुंधरा हसली, हे माझं 'Doll House " आहे, लहानपणी आम्ही तासनतास ईथे असायचो ",

"आम्ही म्हणजे? "

"आम्ही म्हणजे मी.. ( आम्ही सरदार. You know?... वसुंधरा डोळे मिचकावत उपरोधाने हसली )

ओह माय माय!.. केव्हढ्या निरनिराळ्या बाहुल्या आहेत ग…:

'आम्ही अनेक देश फिरलो लहानपणापासून, आता ईथे आम्ही म्हणजे आमची सगळी फॅमिली बरं का, तर आम्ही जिथे जिथे गेलो तिथून आणलेल्या आहेत या सगळ्या बाहुल्या आणि काही तर अगदी जुन्या आहेत, ठकी पासून सगळ्या बाहुल्या आहेत, हि मेक्सिकन, हे कॅबेज पॅच, आणि हि गुलाबी गालांची रशियन " वसुंधरा एक एक बाहुली दाखवत होती, सगळीकडे बाहुल्यांचं संमेलनच भरलं होतं जणू, अगदी अंगठ्याएवढ्या छोट्या बाहुलीपासून ते माणसाएवढ्या मोठ्या बाहुलीपर्यँत सगळे प्रकार होते त्यात, दुसरी तशीच एक खोली वेगवेगळ्या पुरातन

चांदी आणि सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली, सुहृदच्या माँ तशा कल्पक होत्या त्यामुळे त्यांनी काही पुरातन सोन्याच्या वस्तूंपासून वापरता येण्याजोगे दागिने बनवून घेतले होते, उदा. सोन्याचं कान कोरणं असेल तर दोन्ही बाजूंनी दोन माणकं आणि मध्ये ते कान कोरणं गुंफून त्याचा नेकेलस, किंवा जाड जाड चांदीच्या वाक्या असतील तर त्या खाली ठेवून वर त्यावर समई ठेवली होती, सोन्याची जाळीदार नक्षीची पर्सही अशीच कशापासून तरी बनवलेली होती, अस्सल जर असलेल्या पैठण्या त्यापासून तयार केलेलं जॅकेट, भरीव चांदीचा चेस बोर्ड, अशा असंख्य वस्तूंचं दालन होतं तिथे, बघता बघता देवयानी थक्क होऊन गेली,

"आता 'आयुधचापशाला 'म्हणजे शस्त्रागार, दाखवते तुला चल " दोघी एका मोठ्या दालनाला वळसा घालून मागच्या बाजूला आल्या त्यातले शस्त्रांचे विविध प्रकार बघताना देवयानी चकित झाली, " यातली बरीचशी शस्त्र सरकार जमा केलेली आहेत, नाहीतर तू आणखीन डोळे विस्फारले असतेस. " मिश्किल हसत वसुंधरा म्हणाली.

काही वेळाने त्या टेहळणीच्या जागेवर उभ्या होत्या, "हे बघ या दोनच तोफा आत्ता दाखवायला आहेत तुला, अर्थात बाकीच्या सरकार जमा. ही बघ ही 'पील नाला ' हत्तीवरून या तोफेचा मारा

करायचे, आणि ही ‘ शतुरनाला ‘ उंटावरून या तोफेचा मारा करायचे.

“अमेझिंग... वसुंधरा तुमच्या घराण्याचा ईतिहास सांग ना जरा, सुहृदचं आडनाव कदम असं सांगायचा तो. तेच आहे का? “

“ तेच, पण नुसतं कदम नव्हे, ’ सरदार कदमबांडे ‘, पुढे त्याचं नामकरण आम्ही कदम एवढंच केलं, पण माँ अजून आपला वारसा सोडायला तयार नाहीत, त्यामुळे त्या त्याच वेशात आणि अविर्भावात वावरतात. तू पाहिलं असशील तर बाकी आंम्ही सर्व आधुनिक आणि साध्या वेषात असतो. “

“हो पाहिलं मी, सुहृदनेही कधी दाखवलं नाही असं, infact सुहृद बरोबर येताना फक्त अमरापूरची एक गढी बघायला जायचंय, सरदारांच्या बरोबर तो रहातो एवढंच ठाऊक होतं, ते बघायचं म्हणून आम्ही सर्व मित्र-मैत्रिणी येणार होतो, मी तर सामान घेऊन होस्टेल सोडून निघाले होते, म्हणून सुहृद आधी सगळ्यांना घेऊन मग मला पिक-अप करणार असं ठरलेलं, सकाळी खाली येऊन पाहते तो सुहृद एकटाच आलेला, बाकीचे सगळे मागाहून येणार असं त्याने सांगितलं, मी ही जास्त विचार न करता निघाले. “

“ओह आय सी !.. “

अजून काही वेळ मनसोक्त फिरल्यानंतर वसुंधरा म्हणाली, “चल देवयानी निघुयात आपण, उरलेलं गढी दर्शन नंतर करूयात अजून आहेस ना थोडे दिवस? “

“ माहिती नाही गं, ठरवलं नाहीये अजून काही, तुला एक विचारू वसुंधरा ?”

“विचार ना.. ” वसुंधरा जरी असं म्हणाली तरी देवयानीने असं विचारल्या बरोबर तिच्या चेहेऱ्यावरची झालेली चल-बिचल, तिला लपवता आली नाही. जणू ती काहीतरी अप्रिय विचारणार आहे हे वसुंधरेला ठाऊक होतं.

देवयानी शांतपणे तिच्या चेहेऱ्यावरचे बदललेले भाव टिपत होती, तितक्यात वसुंधरा म्हणाली, “तुला काही तरी विचारायचं होतं ना देवयानी? “

“ हो, पण एक नव्हे अनेक गोष्टी विचारायच्या आहेत, आधी कोणती विचारू हा विचार करतेय “ ती कसंनुस हसत म्हणाली.

“ बरं करा सावकाश विचार, हे बघ आली तुझी रूम, चल भेटू पुन्हा संध्याकाळी, चहाच्या वेळेला “

“ वसुंधरा थांब ना प्लिज, थोडा वेळ चल ना आत. “ देवयानीने तिला आग्रह केला, वसुंधरेने चुळबुळत हातातल्या घड्याळाकडे पाहिलं, आणि ती म्हणाली, “ आत्ता नको, उद्या

येईन, तू आता विश्रांती घे. “ आणि ती सरळ निघून गेली. ती गेली त्या दिशेने देवयानी थोडा वेळ बघत राहिली, मग एक सुस्कारा टाकून ती आत आली. पहिले ऋता किंवा सारंग शी बोलावं म्हणून तिने त्यांचे नंबर डायल केले.

सारंग ने उचललाच नाही, पण ऋता चा लागला.

“ हॅलो, ऋता, देवयानी बोलतेय .. “

“हाय देवी, अगं हा कुठला नंबर आहे? आहेस कुठे तू? तुझा मोबाईल पण लागत नाहीये. ”

“ कमाल आहे, मी सुहृद बरोबर आले नाही का, अमरापूरला? तिथलाच आहे हा नंबर आणि तुम्ही सगळीजणं केव्हा येणार आहात? “

“ भेंडी ssss तू एकटीच तिकडे काय कारतीयेस? मंद आहेस का जरा?.. “

“ म्हणजे? अगं सुहृद घ्यायला आला मला, आणि तो म्हणाला की तुम्ही सगळे नंतर येणार म्हणून. “

“ तू पण चंपकच आहेस, ग्रुप वर एक मेसेज तरी टाकायचास ”

“ मग तुम्ही कोणी का नाही टाकला? ते मरू दे, तुमचं काय झालं यायचं? “

“ आमचं काय झालं काय? सुहृद ने फोन करून सांगितलं की गढीला जायचं कॅन्सल झालं आणि तो तुला तुझ्या घरी ड्रॉप करून पुढे जाईल. मग मध्येच हे काय ठरलं? “

“ ऋता मला काय माहिती बाळे अगं? एक तर आल्यापासून इथे काही ओके वाटत नाहीये मला, मी बाबांना पण फोन करून सांगितलंय, आज त्यांचा फोन पण येऊन गेला असेल, मी बाहेर गेले असताना. मोबाईलला रेंज नसल्यामुळे, कोणाशी पट्कन कॉन्टॅक्टच होत नाही, ते काही नाही मी आजच्या आज सुहृद शी बोलून “ The End “ करून टाकते सगळ्या विचित्र गोष्टींचा आणि उद्या सकाळी इथून निघते. “

“ हो त्या बावळट सुहृदलाच सांग तुला सोडायला, तुझ्या सोनेरी रंगाच्या आणि हनुवटी वरच्या ब्युटी स्पॉट च्या प्रेमात पडला असेल, म्हणून तुला एकटीला तिकडे नेऊन गढी दाखवून, इम्प्रेस करून प्रपोज करणार असेल “

“गप्प बैस मूर्खां. इकडे माझं काय चाललंय, तु काय बोलतेयस. अगं तुला गम्मत माहितीये? सुहृदला इथे, कंठाजी राव म्हणतात “ यावर दोघी खळखळून हसल्या.

, ऋता शी बोलून झाल्यावर खरं तर देवयानी अजून गोंधळात पडली होती, सुहृद ने चक्क खोटं बोलून तिला ईथे आणलं होतं,

आणि ती किती विश्वासाने त्याच्याबरोबर आली होती, क्षणभर तिला वाईट वाटलं, आज आत्ताच त्याच्याशी बोलून घेऊ, समोर कोणी असो वा नसो, आता कोणाला काय वाटेल याचा विचार करायचं काही कारण नाही, दुपारी वसुंधरा नाही का सरळ निघून गेली, तिने विचार केला का आपला? आपल्याला, तरी दुर्लक्ष म्हणजे मूर्खपणा ठरेल.

खोलीची अवजड कडी कशीबशी ती लावतच होती तेवढ्यात संध्याकाळच्या चहाचा ट्रे घेऊन एक नोकर आला, ती त्याला काही विचारणार तोच लांबून वसुंधराही येताना तिला दिसली. बाहेर झोपाळ्यापाशी ये अशा अर्थाने तिने खूण केली, मग देवयानी बाहेर झोपाळ्यावर येऊन टेकली, थोड्याच वेळात वसुंधराही पोहोचली, तिच्या शेजारी बसत म्हणाली, " काय मग विश्रांती झालीच नाही म्हणायची? चेहेरा अजूनही सुकलेला दिसतोय. "

"हो ना अगं फोनवर बोलत होते. "

" एवढा वेळ? '

" नाही गं एवढा वेळ तर नंबर ट्राय करण्यातच गेला, मग कसा बसा लागला तर थोडं बोलले नाही तोच कट झाला, बरं तू थांबतेस पाच मिनिटं ? मी साडे तीन मिनिटात फ्रेश होऊन येते "देवयानी

मिश्किल हसत म्हणाली आणि खोलीच्या दिशेने पळाली, चेहेरा टॉवेलने पुसत जेव्हा देवयानी बाहेर आली, तेव्हा वसुंधरा तिच्याकडे निरखून पाहू लागली. “ देवयानी, तुझ्या गालावर, ओठांच्या खाली, हनुवटीवर, कंठावर, हे जे टपोरे तीळ आहेत ते सगळे खरे आहेत?

“हो म्हणजे काय? सगळे खरे आहेत गं “

“ strange.. पण खूप cute दिसतात ते, सकाळी प्रताप दादा पण म्हणत होता. ”

“काय? “

“हेच की तुझं खरं सौंदर्य, तुझ्या सोनसळी गोऱ्या रंगात नसून तुझ्या या ब्राऊन तिळांमध्ये आहे “ यावर देवयानीच्या डोळ्यासमोर सकाळी ओझरता पाहिलेला राजबिंडा प्रताप उभा राहिला, आणि तिचे गाल आरक्त झाले.

तेवढ्यात पुन्हा एकदा ती काळीज चिरत जाणारी भेदक किंकाळी ऐकू आली. देवयानीने वसुंधरे कडे पाहिलं, ती उठून उभी राहिली होती. तिचा चेहेरा कमालीचा गंभीर झाला होता. पाच एक मिनिट शांततेत गेली असतील, मग मात्र देवयानीने वसुंधरेचा हात पकडून तिला जोरजोराने हलवीत विचारलं, “ ही कोण आहे

वसुंधरा? तिची किंकाळी ऐकली की माझा प्राण कंठाशी येतो, आल्या दिवसापासून मी ही ऐकते आहे, काय आहे हे? “

“ती ‘रानाई’ आहे !!!!.... “ वसुंधरा खाली मान घालून गंभीर होत म्हणाली.

“रानाई !.. ? कोण रानाई? हे तर तुमच्या गढीच नाव आहे ना? “

“ होय, जिच्यावरून या गढीला हे नाव पडलं ती. रानाई, “देवयानी, इथे अशी वदंता आहे की गढीच्या पाया भरणीच्या वेळेला, पाया भक्कम रहावा, ही गढी, चिरकाल सुरक्षित आणि मजबूत रहावी म्हणून तिचं संरक्षण करण्यासाठी काही अमानवी शक्तींना आवाहन केलं गेलं होतं, त्यावेळेला त्यांनी एका गरोदर स्त्रीचा बळी मागितला होता, हौसाक्काच्या वंशजांपैकी कुणीतरी हि जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आणि या ‘रानाई’ चा बळी दिला. “

“आई ग !.. “ देवयानी कळवळून म्हटली.

“ हं.. ‘रानाई ‘ही त्यांचीच कुणीतरी नातेवाईक होती, घरची गरिबी, बाळंतपण परवडत नाही हे बघून हौसक्काच्या पूर्वजांपैकी कोणीतरी तिला आपल्या घरी रहायला बोलावलं, ‘रानाई ‘ही त्यांचीच कुणीतरी नातेवाईक होती, घरची गरिबी, बाळंतपण

परवडत नाही म्हणून हौसक्काच्या पूर्वजांपैकी कोणाच्या तरी घरी ती आश्रीत म्हणून आली होती, त्याच वेळी तिचा बळी द्यायचा हे ठरलं आणि गढीच्या पायाभरणीच्या वेळेस पूजा करायला म्हणून तिला एका खोल खड्ड्यात उतरायला लावलं, बिचारी आठवा महिना लागला होता, तशीच कशीबशी खाली उतरून गेली, तोच वरून सर्वांनी माती लोटली, त्याच क्षणी प्राणभयाने तिने किंकाळी फोडली. असं म्हणतात की या गढीत तिचा सतत वावर असतो, रात्री तीच ईथे फिरत असते. ”

“ बापरे ! … … हॉरिबल आहे हे सगळं.. “ देवयानीला विश्वास ठेवणं कठीण जात होतं.

“ होय.. पण तिने कुणाला त्रास देऊ नये म्हणून पुजाऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे तिची समाधी बांधून, गढीच नाव ‘रानाईची गढी ‘असं ठेवलं, पण देवयानी ही किंकाळी मी आज पहिल्यांदाच ऐकतेय “

“ मी आल्यापासून रोज ऐकतेय, कधी कधी दिवसातून तीन वेळा … “

“काय सांगतेस? “

“ हो, खरं तेच सांगतेय, infact सुहृदला मी विचारणार होते कालच, पण तो मला भेटतच नाहीये, “

“ म्हणजे, आल्यापासून तु एकटीच आहेस? “

“ सोना, i mean मुकी आहे सोबतीला, बाकी कोणी नाही. “

“ ओह, this is not fair, मी बोलते भाईशी, आणि अजून एक सांगू? वाईट वाटून घेणार नसशील तर?”

‘ नाही बोल ना “

“तू उद्याच्या उद्या इथून बाहेर पड, “

“ का? “

“ मी सांगतेय म्हणून, आणि लक्षात ठेव आपल्या या संभाषणाबद्दल कोणालाही सांगू नकोस, इनफॅक्ट मी भाई ला सांगते तुला उदयाच्या उद्या सोडायला “

“ अगं मी जाणारच आहे, तसं मीही ठरवलंच होतं, पण कारण तर सांगशील? “

“ कारण कसं सांगू तुला? बरं ऐक असं म्हणतात की ज्याला ही किंकाळी ऐकू येते त्याच्यावर प्राणघातक संकट येणार असतं, “

“ याच्या आधीही असं काही घडलंय का? बोल ना व सु? “ तिचे खांदे धरून तिला हलवत देवयानी ने विचारलं.

वसुंधरेने तिचे हात आपल्या हातात घेतले, " सॉरी देवी, तुला आत्ता या क्षणी तरी मी काहीच सांगू शकत नाही, पण फक्त तु सुखरूप तुझ्या घरी पोहोचावीस असं, मला मनापासून वाटतं आहे, प्लिज !.. "

"ठीक आहे, मग तूच व्यवस्था कर तशी, मला तर बाहेर कुठून जायचं हे देखील ठाऊक नाही " वातावरणातला ताण कमी करण्यासाठी देवयानी अंमळ हसत म्हणाली.

"ती तर करतेच, पण आत्ता लगेच 'माँ 'शी बोलून तुझी व्यवस्था माझ्या शेजारच्या खोलीत करायला लावते, 'माँ ' नी तुला असं एकटीला पाठीमागे का ठेवलंय कळत नाही, नाहीतर एक काम कर आत्ताच चल, सामान वैगेरे नंतर शिफ्ट करू"

" रिलॅक्स वसु, माझी काळजी करू नकोस, i am enough capable to handle any situation, आधी माँ शी बोलून घे, मग रात्री मी शिफ्ट होते, तसंही सोना आहेच बरोबर "

"ओके डन … मी आत्ताच जाते... चल बाय !.. " वसुंधरा जिना उतरून जाताच तिला बाय करून आपल्या

खोलीकडे जात असताना, काहीतरी जाणीव होऊन, देवयानी अचानक पाठीमागे वळली आणि त्याच वेळी कोणीतरी तिला घाईघाईने शेजारच्या खोलीत आत शिरताना दिसलं.

“कोण आहे तिकडे?.. हॅलो …?” देवयानी देखील मग पळतच त्या खोलीपाशी गेली, ही खोली आत्तापर्यंत बंद होती. कधी आणि कुणी उघडली? आपलं बोलणं कोणी चोरून ऐकलं की काय? “ विचार करत ती आत शिरली, तिच्या रूम सारखीच होती ही रूम, कुठेही काहीही चाहूल लागली नाही, सगळी खोली, आतली कपाटं, पडद्यांच्या मागे, बेडच्या खाली सगळीकडे पाहिलं तिने कोणीही नव्हतं, आख्खी रूम रिकामी होती, जे कोणी मघाशी गुपचूप पळून गेलं ते आत जाताना तिने पाहिलं होतं, काही क्षण ती तिथेच थांबली पण तिन्हीसांजा होऊन आता सगळीकडे अंधारू लागलं होतं, ती मुकाट बाहेर आली, बाहेरून दरवाजा बंद केला, आणि आपल्या खोलीत येऊन बसली. डोक्यात विचारचक्र चालूच होतं, तेवढ्यात “शुक शुक, देवी….. “ कोणीतरी हलक्या आवाजात तिला हाक मारत होतं, तिने आवाजाच्या दिशेने पाहिलं, तर जंगलाच्या बाजूला जी खिडकी उघडत होती तिथून तो आवाज येत होता. ताड्कन उठून ती पळतच खिडकी जवळ आली, “सुहृद? तू??? कुठे गायब झाला होतास? आणि असा खिडकीत.. ?? “

“ देवी तू ताबडतोब इथून निघ, जास्त काही विचारू नकोस, मी सांगतोय ते कर “

“ अरे पण मी जाऊ कशी? “

“ हे बघ मी काय सांगतोय ते नीट लक्ष देऊन ऐक, जंगलातून निघ, आत्ता लगेच निघ, हे जंगल ओलांडून पुढे एक दोन डोंगर लागतील, ते पार करून गेलीस की तिथून खालच्या बाजूला तीन साडे तीन कि. मी. कच्चा रस्ता लागतो, तो संपला की डाव्या हाताला एक सरपंचाची वाडी आहे त्या वाडीतून पुढे रस्ता लागतो तो थेट जुन्नरला जातो, त्या सरपंचाला माझं नाव सांग तो तुझी पुढची व्यवस्था करेल. आधी इथून बाहेर पड लगेच !!.. “

दुसऱ्याच क्षणी सुहृद खिडकीतून अदृश्य झाला, खिडकीला आतून जाळी असल्यामुळे तिला वाकून बाहेर पाहता येईना, ती ताबडतोब जिना उतरून पळत मागच्या बाजूला गेली, पण तिथे कोणीही नव्हतं. खिडकी बऱ्यापैकी उंच होती, कसा आला असेल सुहृद खिडकिपर्यन्त?, ती पुन्हा वर पळत आली, तिला वसुंधरेला फोन करावासा वाटला पण, फोन टॅप होत असतील तर उगाच नसतं संकट नको, मग सामानातली तिची सॅक काढून तिची महत्वाची कागदपत्रं आणि टॉर्च, पाण्याची बॉटल, वगैरे आवश्यक सामान त्यात घालून, अंगात जॅकेट चढवून ती निघाली, सॅक जॅकेटच्या आत घालायला ती विसरली नाही, तसही ट्रेक चा अनुभव असल्यानं ती फार गडबडली नाही, पण या सगळ्या लागोपाठ घडणाऱ्या घटनांचा आपल्याशी असणारा संबंध तिला कळत नव्हता, आपल्याशी कोणाचं काय वैर असावं? आणि कोण

आपल्या प्राणांवर उठलं असावं? हा फार मोठ्ठा प्रश्न तिला पडला होता. सगळ्या प्रश्नांची उत्तरं सुहृदपाशी होती. दार अलगद लोटून ती निघाली, जेव्हढ्या शक्य होईल तितक्या झपाझप ती जंगलच्या दिशेने निघाली, जंगल कीती मोठं आहे आणि ते पार करायला किती वेळ लागणार हे ज्ञान तिला नव्हतं, चालत रहायचं एवढंच तिला कळत होतं, अमावस्या असल्याने तसा काळोख होता, जाता येईल तितक्या वेगाने ती निघाली, मध्येच एका झाडापाशी पांढऱ्या रंगाची काहीतरी खूण दिसली ती थांबली, एक क्षण टॉर्च मारून तिने बघितलं, तिचा अंदाज खरा ठरला, त्या झाडावर सोनाने काढलेल्या आकृतीसारखीच पांढऱ्या रंगाची आकृती होती, याचाच अर्थ परवा तिला स्वप्न पडलं नव्हतं, ती खरोखर जंगलात येऊन गेली होती, पण मग ती तिथून बेड वर आलीच कशी? प्रश्न, प्रश्न आणि निव्वळ प्रश्न, एकाचंही उत्तर आताच्या क्षणाला तिच्या जवळ नव्हतं. अजून एक तास भर चालली असेल नसेल, अचानक काळा बुरखा घातलेली एक व्यक्ती तिच्यासमोर आली, आणि त्याच क्षणी तिच्या तोंडाभोवती एका मजबूत हाताची पकड बसली, क्लोरोफॉर्म च्या उग्र वासाने तिची शुद्ध हरपली !!!..

किती वेळ गेला माहिती नाही, शुद्धीवर आली तेव्हा ती एका अंधाऱ्या जागी होती, डोकं अजूनही गच्च होतं,

हळू हळू तिला एक एक गोष्टी आठवायला लागल्या, सुहृदने सांगितलं म्हणून आपण गढीतून जंगलाच्या दिशेने पळून गेलो, जंगल पार करत असतानाच एका काळया कपड्यातल्या आकृतीने आपल्या तोंडावर हात ठेवला आणि आपण बेशुध्द झालो, अजूनही तिचे हात बांधलेलेच होते, तोंडावरही चिकटपट्टी होती, जेमतेम श्वास घेता येईल किंवा हालचाल करता येईल अशा बोळातल्या एका कोपऱ्यात ती मुटकुळं करून पडलेली होती. जॅकेट तिच्या अंगावर तसंच होतं, देवयानीच्या घशात आवंढा आला, कसं आणि कुठून बाहेर पडायचं? डोकं अजूनही जड वाटत होतं, त्या छोट्याशा तळघरात ती अवघडून गेली होती, जरा हालचाल झाली की डोकं आपटत होतं, तेवढ्यात बाहेरच्या बाजूने काही हालचाल तिला जाणवली, तशी गुडघ्यात मान घालून अंग सैल सोडून ती पडून राहिली तोच कोणीतरी तिच्यावर फोकस मारला, “अजून निपचित हाय !.. औषध जास्त झालया जनू, “ एक जाडा भरडा पुरुषी आवाज होता, “ “तुला पन कोनाला कसं बेसुद करायचं अक्कल न्हाय भाडया, म्येली बिली तर परत आनी कुठनं करायची उस्तवार? आं? “ देवयानीने हौसक्काचा आवाज ओळखला, तिच्या छातीचे ठोके अजून वाढले, “ च्याक, न्हाय आक्के, न्हाय मरणार, पोरटी नाजूक हाय तवा वाईच जास्त टाइम लागल, पन हुईल एक तासाभरात जागी. “

“ चल मग, मागनं परत येऊ निजानीज झाल्यावं, त्ये तिकडं सरदार बी पेटल्येत, तिला सोधायला परताप राव पन बाह्येर पडली हायती. “ ते दोघे निघून गेले, ”अच्छा !.. हे कारस्थान हौसाक्काचं आहे तर, पण तिचं माझ्याशी काय वैर असावं? “ पाच एक मिनिटं झाली तरीही, देवयानी थोडा वेळ तशीच पडून राहिली, ते खरोखरच गेले याची खात्री झाल्यावर तिने इतका वेळ गुडघ्यात खुपसून ठेवलेली मान वर काढली, दीर्घ श्वास घेतला, अवघडलेल्या मानेला झटका दिला, हाताची झटपट करून बांधलेला दोर काढण्याचा प्रयत्न केला, तो निघाला, आता तोंडावरची चिकटपट्टी काढून ती परत सावधपणे सरपटत त्या बोळकांडीतून पुढे निघाली, आता थोडा वेळ तरी कोणी येणार नाही निदान हे दोघे तरी नाही, पुढे गेल्यावर तिला छोटासा बंद दरवाजा दिसला, तो अर्थातच बाहेरून बंद असणार, पण, ‘टॉर्च ‘ चा फोकस पुन्हा मारताना एक गोष्ट नव्याने आता तिच्या निदर्शनास आली ते म्हणजे त्या दरवाज्याच्या डाव्या बाजूला एक छोटीशी खिट्टी होती, ती त्या दरवाजाचाच एक भाग असावी अशा बेमालूम पद्धतीने बनवली होती म्हणजे तो आतूनही उघडता येत असावा, खिट्टी बघत असताना तिला दिसलं, तिच्यावर खूप खाचा होत्या ज्याच्यावर बारीक आकडे टाकले होते ५, ३, १ अशा विषम पद्धतीचे, म्हणजे अर्थातच त्याचा काहीतरी संबंध असणार काय

असेल ते?, तिने वेगेवेगळे कॉम्बिनेशन्स करून खिट्टी फिरवून पाहिली पण खिट्टी हलली नाही, वेळ वाया जात होता, क्षण न क्षण महत्वाचा होता, पुन्हा तिने ती खिट्टी पहिल्यांदा पाच, मग तीन मग दोन, मग एक अशी एकदा उजव्या आणि एकदा डाव्या बाजूने फिरवली, नाही, उघडेंचना, हातोडा असता तर एवढे नखरे केले नसते या खिट्टीचे, दिला असता एक दणका ठेवून, मनात चरफडत देवयानी म्हणाली, मग पुन्हा तीने एक दीर्घ श्वास घेतला, एक क्षण शांततेत गेला आणि तिच्या एकदम डोक्यात क्लिक झालं की इथले रस्ते वैगेरे जसं फसवं आहे तसंच या खिट्टीवरचे आकडे वैगेरे फसवे असतील तर? मनात यायचा अवकाश मघाची खटपट सोडून देऊन अलगद बोटाने तिने ती सरकवून बघितली आणि नवल म्हणजे, अतिशय सहजपणे दरवाजा उघडलं गेला जणू काही तो स्प्रिंगचा होता. म्हणजे लावलेलं कुलूपही फसवच होतं तर अरेच्या !.. आता देवयानी वर आली, वर आल्यावर आधी तो दरवाजा तिने बंद करून टाकला आणि आजूबाजूला काय आहे हे पहायचा प्रयत्न केला पण डोळ्यात बोट घालूनही दिसणार नाही एवढा अंधार होता, आत्ता लगेच टॉर्च वापरणं धोक्याचं होतं त्या मिट्ट काळोखात कुठलं संकट दबा धरून बसलं असेल माहिती नव्हतं अंदाजे चाचपडत आणि रांगत, आणि शेवटी मग ती सरपटत निघाली, सर्वत्र सामसूम होती, पण एक विचित्र कुबट आणि कुंद असा वास

सगळीकडे भरून राहिला होता, लांबलचक आणि अरुंद असा तो बोळ पार करत असताना, त्या कुबट वासाने डोकं जड व्हायला लागलं तसं तिने कुंभक करत श्वास रोखून धरायला सुरुवात केली, गेली कित्येक वर्ष निष्ठेने योगा आणि प्राणायम करण्याचे फायदे तिला इथे दिसत होते, बराच वेळ ती श्वास रोखून धरू शकत होती. काही वेळातच जरा अंधुक अंधुक दिसायला लागलं आणि पुढे समोर एक मोकळा चौक लागला, सावधपणे देवयानी कोपऱ्यात सरकली आणि उठून दोन पायांवर बसली, शक्य तितक्या लपून आजुबाजुचा परिसर न्याहाळू लागली, ती ज्या बोळातून आली होती तसेच शेजारी दोन बोळ होते आणि तिथेही छोटी दारं होती मधल्या चौकात गुलाल, बुक्का, काही वाळलेल्या काटक्या विखुरलेल्या होत्या, रक्ताचे वाळलेले डाग, आणि असंख्य पिसं, बहुधा कोंबडीची वगैरे असावी. चारही बाजूला नजर फिरवून, कोणी नसल्याची खात्री करून देवयानी, शेजारच्या बोळात शिरली, इथे मानवी मल -मूत्राचा भयंकर वास सुटला होता, पुन्हा एकदा तिने श्वास रोखून धरला, तितक्यात तिला एक किंकाळी तिला ऐकू आली, ईतक्या जवळून की देवयानीने दोन्ही कान क्षणभर गच्च झाकून घेतले, आवाज आला त्या दिशेने तिने पहायचा प्रयत्न केला, शेजारी बहुधा लोखंडी दरवाजा असावा, सावधपणे तिने बॅटरी चा फोकस मारला, भलं मोठं लोखंडी कुलूप

लावलेल्या बंद जाळीच्या दरवाजाच्या आत, अगदी समोरच, दोन्ही पाय पसरून, एक स्त्री बसली होती, बॅटरीच्या झोताने ती बिथरली असावी, तिने पुन्हा एकदा किंकाळी फोडली. ती बहुधा वेडी असावी, तिच्याच आजूबाजूने तो घाणीचा दर्प येत होता वेळी अवेळी हिचीच किंकाळी ऐकू येत होती का? मग हीच रानाई असेल काय? पण कसं काय ती तर बळी गेली ना ? मग ही कोण? काहीही असो, पुन्हा एकदा ती भेसूर किंकाळी ऐकायची देवयानीची तयारी नव्हती, तिच्यावर पुन्हा बॅटरीचा फोकस मारत, एका हाताने तिला गप्प राहायची खूण, करत असताना, तिचा ओरडण्यासाठी केलेला 'आ' तसाच राहिला, तिची जीभ अर्धवट कापलेली होती, अंगावर खूप मारल्याने काळे निळे वळ होते, देवयनीचा जीव गलबलला कोण असेल ही दुर्दैवी स्त्री आणि हिची अशी दशा कोणी केली असेल? वयाने ती लहान दिसत होती, तेवढ्यात कुणाची तरी चाहूल लागली कोणीतरी त्या बाजूला येत होतं, आता काय करायचं? सावधपणे ती बाजूच्या कपारीत ती शिरली. एक धिप्पाड व्यक्ती वाकून आत बोळात आली, हातात पेटवलेली मशाल होती, त्याच्या उजेडात आपण दिसू नये म्हणून देवयानी शक्य तितकं अंग चोरून उभी राहिली, हातातल्या जाडजूड किल्लीच्या जुडग्याने त्या व्यक्तीने ते भलं मोठं कुलूप काढलं आणि आतल्या त्या वेडीला फरफटत बाहेर ओढलं, "च्यायला घाणीघान करून ठेवलीय नुसती

“, असं, म्हणून त्याने तिच्या कमरेत लाथ घातली आणि देवयानीला स्वतः:चा संताप आवरायला खूप कष्ट पडले, मग तिला फरपटत बाहेरच्या चौकात नेले, त्याच्या चार -दोन फटक्यांनी आधीच मरणासन्न अवस्थेत असलेली ती स्त्री निपचित पडली असावी, तिला घेऊन तो आतल्या बाजूला गेलेला दिसला तशी देवयानी, खोलीत शिरली, त्या खोलीला काही ‘झरोका’ किंवा खिडकी दिसते आहे का ते तिने तपासून पाहिलं, त्या खोलीला वर जाणारा एक बसका जिना होता, पण तिथपर्यंत जायला देवयानीला वेळ नव्हता, दुसऱ्या भिंतीच्या वरच्या बाजूला हाताने चाचपडलं असताना तिला एक आऊटलेट लागला, आता त्याला लोम्बकळून त्या सपाटीतून आधी मान घालून तिने बाहेर पहायचा प्रयत्न केला, डोकं जेमतेम बाहेर निघतय असं दिसताच देवयानीने प्रथम खांद्यावरची सॅक कशी बशी काढली आणि बाहेर टाकली, धपकन आवाज आला, त्यावरून तिला बाहेरच्या खोलीचा अंदाज आला, बाहेर फार खोल नसावं म्हणजे तो हि एक तळघराचाच भाग होता की काय, काहीही असो बाहेर पडणं महत्वाचं होतंच, आधी डोकं बाहेर काढून, मग उरलेलं अंग बाहेर काढून, तिने खाली उडी मारली, खाली उडी मारताच वातावरणात एकदम गारठा जाणवला, “या ssssss !.. अगदी अलगद बोलावून घेतल्यावानी पुढ्यात बोलावलं म्हनायचं देवींनी तुम्हास … “ घुमलेल्या आवाजाच्या

दिशेने देवयानी ने पाहिलं, समोर भला मोठा कुंकवाचा मळवट भरून, केस पिंजारून हौसाक्का बसल्या होत्या, त्यांच्या मागे एक अतिशय उग्र अशी देवीची मूर्ती होती, तीच दात विचकून भेसूर हसणारी, ती उतरली ते एक अतिशय प्राचीन मंदिर असावं असं दिसत होतं, पूर्ण दगडी बांधकाम असलेलं आणि प्रत्येक खांबात पेटत्या मशाली खोचलेल्या होत्या,, आणि हौसाक्का च्या शेजारी 'सुहृद 'बसला होता, त्याच्या ही गळयात कवड्यांच्या माळा आणि काहीबाही घातलेलं होतं, कापालिक पंथाचे असतात तसे काळे कपडे, आणि लाल मुंडासं डोक्याला बांधलेलं. त्याचे लाल तारवटलेले डोळे बघून देवयानी चे डोळे विस्फारले, " अरे देवा, सुहृद?.. " कवट्यांच्या माळा घालून, मंत्रोच्चार करताना, हिंस्त्र वाघिणीसारखा दिसणारा हौसाक्काचा तो चेहेरा बघून देवयानी सुद्धा क्षणभर घाबरली, ह्या भयानक गोष्टींची तिने कल्पनाही केलेली नव्हती. हौसाक्का आणि सुहृद मांत्रिक?

, " सुरद्या तिला उचलून तकडं गोजीच्या तलावात न्हेऊन बुचकळून आन, आनी ओलेती ईथ माझ्या पुढ्यात बशीव. बारा वाजायच्या आत बळी ग्येला पाहिजे देवीला, आणि मुकी कुठाय? " मग दुसऱ्या सेवकाकडे वळून ती खेकसली, " ए सुक्काळीच्या, आटप की कवापासुन चाललिया तयारी?मघाची कोमडी आन, मुकीला बी घिऊन ये देवीच्या गंनानला आधी निवद ग्येला पाहिजे

SSS. ” तेवढ्यात तिथे मघाच्या त्या वेडीला आणि सोनाला आणलं गेलं, ‘सोना ‘आईच्या या अवताराकडे पाहून भेदरलेली होती. एव्हाना देवयानीला ओढत नेऊन, सुहृद ने तिला तलावात बुचकळायचा प्रयत्न केला, तेव्हड्यात त्याच्या मनगटाला कडकडून चावा घेऊन देवयानी त्याच्या हातातून निसटली, ‘सुहृद’ गांजाच्या नशेत असल्याकारणाने त्याचा झोक जात होता पण देवयानी निसटल्यावर त्याने जोरात शिव्या द्यायला सुरुवात करत दोघांना तिला पकडायला पाठवलं, ईकडे ‘ सुहृदच्या ‘हातातून निसटलेली ‘देवयानी ‘वाट फुटेल तशी पळू लागली, तलाव वरच्या बाजूला होता, आता सगळा जंगलाचा परीसर लागला होता, झाडी दाट नव्हती पण, उंचसखल भागा मुळे तिला धावताना अडचणी येत होत्या, तिच्यामागे पाठलाग करणारे तिला अल्पावधीतच गाठतील याची तिला खात्री वाटू लागली. तशीच पडत ठेचकाळत ती सैरावैरा धावत सुटलेली असतानाच समोरून एक घोडेस्वार चौखूर उधळत आला आणि तिला उचलून तितक्याच वेगाने वळून जंगलात निघून गेला, देवयानीला पकडायला आलेले लोक काहीच न उमजून बघत राहिले. हा घोडेस्वार कुठून आला, कुठे गेला याचा अंदाज येईस्तोवर तो गायब झाला होता, हा कोणी बाहेरचा माणूस असेल तर हौसाक्काला प्रथम सावध करणे गरजेचे आहे हे सगळयांच्या लक्षात आले आणि ते तसेच आत धावत

सुटले, ईकडे देवयानीने ओरडू नये म्हणून त्या स्वाराने तिचे तोंड गच्च आवळून धरले होते, त्याच्या मजबूत हातांच्या पकडीपुढे देवयानी हतबल झाली, किती वेळ घोडा दौडत होता देव जाणे, आयुष्य आता संपलं असं देवयानीला वाटत असतानाच एकदम तो घोडेस्वार एके ठिकाणी थांबला, ती एक पुरातन ईमारत असावी, 'देवयानी 'बेशुद्ध पडली आहे असे समजून त्याने तिच्यासकट घोड्यावरून खाली उडी मारली, आपल्या मजबूत बाहुंमध्ये तिला घेऊन दमदार पावलं टाकत, खांद्याच्या धक्क्याने खालच्या एका खोलीचा दरवाजा उघडून तो आत आला, तिथल्या प्रशस्त बेड वर देवयानीला अलगद झोपवल, दरवाजा पुन्हा लावला आणि टीपॉयवर ठेवलेल्या काचेच्या भांड्यातून त्याने ग्लासमध्ये पाणी ओतलं, आणि झोपवलेल्या देवयानीच्या दिशेने तो सावकाश वळला, तोच ती उठून बसलेली त्याला दिसली आणि ती अशी एकदम उठून बसेल याची कल्पना नसल्याने तो दचकला, देवयानीही प्रतिक्षिप्त क्रियेने किंचाळली, " सारखी काय किंचाळतेस? " चेहेऱ्यावरचा मास्क काढत तो स्वार खेकसला, तो प्रताप होता, त्याला बघून देवयानी आणखीनच भेदरली, आता कोण नक्की आपल्याला वाचवणारं आहे आणि कोण मारणार आहे खरंच समजेनासं झालं तिला, 'प्रताप 'पण हौसाक्का ला मिळालेला आहे की काय? धीर सुटून ती मोठ्याने रडायला

लागली, तिच्या या विचित्र अवस्थेची प्रताप ला जाणीव झाली, तिच्या जवळ येऊन तिला शांत करत तो म्हणाला, “घाबरू नकोस ‘देवयानी’ तू सुरक्षित आहेस, मला ईथे पाहून तुला आश्चर्य वाटून देऊ नकोस, मी गेले कित्येक दिवस गढीबद्दल पसरलेल्या अफवेचा गुप्तपणे शोध घेत होतो, तुला वेळी अवेळी किंकाळ्या ऐकू येतात हे वसुंधरा देवींकडून समजल्यावर मी आणखी सावध झालो होतो, कारण तुझ्या आधीही सुहृद ची एक मैत्रीण अशीच गायब झाली जिला तुझ्यासारख्याच किंकाळ्या ऐकू येत असत, त्यामुळे मी तुझ्यावरही लक्ष ठेऊन होतोच पण कशी कोण जाणे तू निसटलीस माझ्या नजरेच्या टप्प्यातून. असो आता ईथे तू सुरक्षित आहेस काळजी करू नकोस, शांतपणे झोपलीस तरी चालेल, हा गढीचा मागचा भाग आहे, ईथे फक्त माझी माणसं आहेत “

“ओह.. म्हणजे परवा मला जंगलातून तुम्हीच रूम मध्ये आणलंत तर?” एव्हना तिचं रडणं थांबलं होतं,

“अर्थात !.. पण ते ईतक महत्वाचं नाहीये.. मला एक सांग आत्ता तु जंगलात कशी? आणि तुझ्या मागे लागलेली माणसं कोण होती? “ मग देवयानीने आज संध्याकाळ पासून घडलेल्या सगळ्या घटनांचा थोडक्यात आढावा प्रताप ला दिला, त्यालाही

हौसाक्कावरच संशय होता पण सुहृद हौसाक्काला सामील आहे हे ऐकून त्याला शॉक तर बसलाच पण काळजीही वाटली.

" मला त्या हौसाक्काचा शोध घ्यायचा आहे, तिला रंगे हाथ पकडून पिताजींना सोपवायचं आहे, तिने सगळ्यांना आपल्या दिखाऊ वागण्याने आणि गोड बोलण्याने भुलवून ठेवलं आणि त्या आवरणाखाली तिची कृष्ण कृत्य लपत गेली, पण हे आपण नंतर बोलू, वेळ फार थोडा आहे, ती नक्की कुठे आहे ते कळत नाही, गढीवर सगळीकडे भुलभलैय्या आहे, कित्येक रस्ते अजून मला देखील ठाऊक नाहीत फक्त त्या हौसाक्का ला ठाऊक आहेत " प्रताप आपल्या तोंडावर पुन्हा मास्क चढवू लागला, तशी देवयानी बेडवरून खाली उतरत म्हणाली, "प्रताप मी पण येते तुमच्या बरोबर "

" well, आलीस तरी हरकत नाही, पण तुला घोड्यावर माझ्या पुढ्यात बसावं लागेल " प्रताप मिस्कील पणे हसत म्हणाला. "एवढ्या संकटात तुम्हाला विनोद कसा सुचू शकतो? " आणि तसंही घोड्यावर तुला पण बसता येणार नाहीच, हौसाक्का जिथे आहे तिथे तुझा लाडका 'भानु 'काही कामाचा नाही "

"अरे व्वा !.. बरीच माहिती मिळवलेली दिसतेय माझ्याबद्दल, आणि काय गं माझ्या घोड्याला मी लाडाने 'भानु

'म्हणतो पण फक्त एकांतात, तुला कसं कळलं? ", तशी देवयानी हसली, "चला सध्या तरी मला रस्ता माहितीये तो मी सांगते, मग नंतर बाकीचं सांगेन, आणि हो तुमच्या 'भानुला 'जंगलातच बांधा, आपल्याला पळून जायला नंतर लागेल तो "

"एकदा तू म्हणतेस, एकदा तुम्ही म्हणतेस, ठरव काहीतरी नक्की काय म्हणायचं " प्रताप पुटपुटत बाहेर आला.

दोघेही मग जंगलातून लपत छपत तलावाच्या दिशेने निघाले, काही वेळापूर्वी पळताना काही गोष्टीची तिने मनात नोंद केली होती, त्या तिला आत्ता उपयोगी पडत होत्या, उदा. जंगल सगळीकडे सारखं नव्हतं, काही भाग सपाट मैदानाचा होता, मैदान लागलं की त्याच्या डाव्या बाजूला जंगलाची एक दिशा सरळसोट उंच अशा झाडांनी व्यापली होती आणि त्या झाडांवरून मोठाल्या असलेल्या अजस्त्र वेली लोम्बकळत होत्या, त्याच्याच पुढे उजव्या दिशेला तलाव होता आणि तिथूनच पुढे कुठेतरी खाली तळघरात ते अवाढव्य मंदिर होतं, ते कमीत कमी वेळात शोधणं हे जरी आव्हान असलं तरी निदान शोधण्याची एक दिशा निश्चित झाली होती, हौसाक्काची माणसं मागावर असली तरी आता ती एकटी नव्हती प्रताप तिच्या बरोबर होता, रातकिड्यांचे कर्कश आवाज जरी येत असले तरी त्यातूनही एक सूक्ष्म ढोल आणि झांजा यांचा आवाज

लपत नव्हता त्या आवाजाच्या दिशेने ती दोघे लपतछपत निघाली, साधारण अर्धा पाऊण तास चालल्या नंतर तो आवाज आता मोठा मोठा ऐकू येऊ लागला, आणि झाडांची रचना बदलेली दिसायला लागली, आत्तापर्यंत दाट, कशीही वाढलेली जंगली झाडं जाऊन सरळसोट उंच अंतरा अंतरा ने लावलेली आणि त्यांच्या वरून त्या अजस्र वेली लोंबकळत असलेल्या दिसायला लागल्या तसं अंधारातही दोघांनीं एकमेकांकडे सूचक नजरेने बघितलं, त्या वेलींना टारझन सारखं पकडून पुढे गेलं तर वेळ वाचणार होता, पण नाजूक दिसणाऱ्या ‘देवयानी ‘ला हे जमेल का असा विचार प्रताप च्या मनात येतो न येतो तोच देवयानी त्या वेलींना पकडून झोका घेऊन पुढे गेली देखील होती, त्याला तिच्या हुशारीचं आणि धाडसाचं कौतुक होतंच ते आता अधिक वाटू लागलं, काही झाडं ओलांडल्यानंतर, जसा जसा तलाव जवळ येऊ लागला तसे आवाजाचे पडघम आणि हौसक्काचा घुमल्याचा आवाज येऊ लागला, “ हं हं... हं. मध्यानरात उलटाया लागलीया, अजून बळी न्हाय पोहोचला, मी उपाशी हाय, रगात पाहिजे, रगात पाहिजे… !”आवाज थांबला, काही सेकंद गेले असतील नसतील आणि एक जोरदार किंकाळी ऐकू आली, देवयानीला मंदिर सापडायला आणि त्या दुर्दैवी स्त्री च्या मानेवर तलवारीचा घाव बसायला एकच गाठ पडली, कापलेलं शीर धाडदिशी देवयानीच्याच पायात पडलं,

सर्वत्र रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या तशी हौसाक्का जवळ बसलेली ‘सोना’ उठून भेदरून रडायला लागली, आता घुमण्याऱ्या हौसाक्का ची मान हातातल्या त्या रक्ताळलेल्या तलवारीसकट, ‘सोना ‘ कडे वळली, “ चला मुकी बाय, देवीकरता काय बी करायला तयार व्हायला होवं, या पुढं.. हो !... ” हौसक्काच्या घशातून विचित्र दुहेरी आवाज ऐकून सोना केविलवाणी होऊन रडत ओरडत पळत सुटली, सेवक तिला धरायला धावले तोच चपळाईने देवयानी पुढे आली आणि तिने सोनाला घट्ट मिठीत घेतले, “ हौसाक्का SSSSS खबरदार तिला हात लावाल तर !... पोटच्या लेकीला मारायला निघालात? शरम वाटली पाहिजे आई म्हणवून घेताना.. शी !.. ”

“आलीस परत SSS !.. बघितलं SSS ?, ठावं होतं मला, सुरद्या भाड्या, मघा तुझ्या हातातून निसटली हुती, धर तिला, नाहीतर बट्ट्याबोळ हुईन समदा, हाता तोंडाशी आलेला घास जाऊ द्यायचा न्हाय, धर तिला ssss !.. ” डोळे गरगरा फिरवत हौसाक्का तलवार घेऊन धावली, पण सुहृद् जागचा हलला नाही, त्यावर हौसाक्काने त्याच्याकडे चरफडून पाहिले आणि ती जागीच थबकली, त्याला मागून प्रतापने घट्ट धरले होते आणि बाकीचे दोन धिप्पाड सेवक खाली पडले होते, हे कधी घडलं? परताप राव कधी आले? त्यास्ना ही हडळ कवा भेटली? “ ‘प्रतापने ‘मास्क लावला

असला तरी हौसाक्का ने त्याला ओळखले होते, आता तिचे उरले सुरले अवसान गळाले, हातातली तलवार टाकून, खाली बसून, त्याच्या पायावर डोकं बडवून घेत हौसाक्का एकदम हेल काढून रडायला लागली, " सरदा SSSSS र, आपल्या गढीला वाचवाया हवं म्हून करत व्हते समदं, मनावर दगड ठिऊन माज्या लेकीचा बी बळी देत हुते, पन ईस्कोट झाला समदा ह्या भवानी नं येऊन समदं उधळलं .. देवी कोपनार आता, आपली गढी काय वाचायची न्हाय sssss "

प्रताप ने काही न बोलता सुहृद च्या दोन कानफाडात दिल्या आणि त्याच्या मुसक्या आवळल्या, कारण काही बोलायच्या अवस्थेत तो नव्हताच, गांजाच्या नशेने त्याचा पूर्ण ताबा घेतला होता, मग हौसाक्कालाही धरून तिथल्याच एका खांबाला बांधून घातलं, बाहेर जाऊन एक सांकेतिक हाळी दिली, त्यातून त्याच्या 'भानु' ला त्याचा संदेश कळला तसं ते उमदं जनावर ठराविक ठिकाणी जाऊन प्रताप च्या काही माणसांना थोड्याच वेळात घेऊन आलं, खाली बळी गेलेला मृतदेह तिथेच ठेऊन बाकीच्या सर्वांना जायबंदी करून ते घेऊन गेले, प्रताप आणि देवयानीही' सोनाला' घेऊन निघाले, आता उजाडत आलं होतं, त्याच वेळी तळघरातून पुन्हा एकदा ती किंकाळी ऐकू आली, देवयानी ने चमकून प्रताप कडे पाहिलं, आवाजाच्या दिशेने त्याने 'भानु ' ला वळवलं, त्या

वेड्या स्त्री ला जिथे ठेवलं होतं तिथूनच तो आवाज येत होता, तिच्या खोली तून जो जिना निघत होता, तिथे देवयानी ने तपास केला असता तिथे चक्क एक टेप रेकॉर्डर ठेवलेला आढळला, "ओह!.. म्हणजे त्या स्त्री ने तळघरातून किंकाळी फोडली की ती रेकॉर्ड होऊन दुप्पट आवाजात बाहेर ऐकू येईल अशी व्यवस्था होती तर.. म्हणजे हा भाग देवयानी जिथे रहात होती त्याच्याच खालचा असला पाहिजे कारण बाकी ईतर ठिकाणी हे ऐकू येत नव्हते, म्हणजे 'रानाईची किंकाळी ऐकू येते ही हौसक्काच्या सुपीक डोक्यातून निघालेली कल्पना होती तर, पण ती हे सगळं का करत होती? आणि कोणाच्या सांगण्यावरून? "

" माहिती नाही देवयानी, या सगळ्या प्रश्नांची उत्तरं हौसाक्का कडेच आहेत, "

" एका प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे आहे प्रताप, हौसाक्काला मदत करणारी गढीतलीच व्यक्ती आहे "

"म्हणजे सुहृद व्यतिरिक्तही? "

"हो "

" यु मीन आमच्यापैकी कोणी? " प्रतापने आश्चर्याने आणि अविश्वासाने भिवया उंचावल्या .

"हो " देवयानी ठाम पणे म्हणाली.

“कोण आहे ती व्यक्ती? तु पक्कं माहिती असल्याशिवाय बोलणार नाहीस, ठाऊक आहे मला “

“ माँ … “

यावर प्रताप काही बोलला नाही, तरी त्याला धक्का बसला आहे, शिवाय शरमही वाटते आहे हे उघड दिसत होतं. सोना आणि देवयानी ला वसुंधरेच्या खोलीत सोडून प्रताप ताबडतोब थोरल्या सरदारांकडे गेला, मात्र पेंगत असलेल्या सोनाला वसुंधरेच्या ताब्यात देऊन देवयानीही त्याच्याबरोबर निघाली, तपासाअंती मुख्य सूत्रधार, हौसाक्का आणि तिच्या माणसांना पोलिसांच्या ताब्यात दिलं गेलं, माँ ना ही पोलिसांनी ताब्यात घेतलंच पण त्यांच्याविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध न झाल्याने पुराव्याअभावी त्यांना जामिनावर सोडण्यात आलं,

आरस्पानी सौंदर्य असलेल्या, सदैव भरजरी, उंची, रेशमी साड्या आणि दागिने घालून छत्र चामरं डोक्यावर ढाळत बरोबर लवाजमा घेऊन फिरणाऱ्या, ‘माँ ‘ आज दीनवाण्या अवस्थेत, अपराधी चेहेरा घेऊन थोरल्या सरदारांच्या पुढ्यात बसल्या होत्या, समोर प्रताप, देवयानी आणि वसुंधरा ही बसले होते.

“ हं.. बोला सारीका देवी !.. आपल्या कृष्णकृत्यांचा पाढा, आपल्याच तोंडाने या मुलांसमोर वाचा, काल रात्री माझ्यापुढे जे

गरळ ओकलात ते सगळं या मुलांना सांगा, तुमच्यासाठी ही शिक्षा पुरेशी आहे. करा सुरूवात “

असं म्हणून थोरल्या सरदारांनी बैठकीवरच बसल्या बसल्या डोळे मिटून मागे मान टेकवली, त्यांच्या चेहेऱ्यावर कमालीच्या वेदना होत्या. अपराधी पणाची जाणीवही होती. आपल्या दिवंगत प्रथम पत्नीचं म्हणजेच वसुंधरा आणि प्रताप ची आई ‘शारदा देवी ‘यांचं त्यांना या वेळी तीव्रपणे स्मरण होत होतं, अत्यन्त सात्विक आणि सोज्वळ चेहेरा तसंच मन लाभलेल्या ‘ शारदा देवी ‘, जोपर्यंत होत्या तोपर्यंत गढीत भरभराट होती, सगळे सुखा - समाधानाने नांदत होते, पण चांगल्या माणसांना देवही आपल्याकडे लवकर बोलावून घेत असतो म्हणतात ना, तसंच एके दिवशी कावीळ झाल्याचं निमित्त होऊन दोन लहान मुलांबरोबरच थोरल्या सरदारांनाही पोरकं करून ‘शारदा देवी ‘ स्वर्गवासी झाल्या, त्यानंतर थोरले सरदार सैरभैर झाले, त्यावेळी काही काळ मुलांची जबाबदारी गढीत लहानपणापासून कामाला असणाऱ्या हौसक्कानी घेतली, वरवर कष्टाळू आणि गोड स्वभावाने वावरणाऱ्या हौसाक्का मनातून अत्यंत कपटी आणि स्वार्थी वृत्तीच्या होत्या, मुलांच्या निमित्ताने गढीच्या अंतर्भागात त्यांचा प्रवेश झाला होताच, हळूहळू सगळयावरच कब्जा करण्यासाठी त्यांची कारस्थानं सुरू झाली त्याचाच एक भाग म्हणून अचानक

एके दिवशी ‘सारीका ‘ नावाचं एक वादळ, हौसाक्का गढीवर घेऊन आल्या आणि गढीची दशाच बदलली. सौंदर्य आणि तारूण्य दोन्हीचं भरभरून वरदान मिळलेल्या सारीकाने सरदारांना वेड लावलं नसतं तरच नवल होतं. यथावकाश सारीकाची सरदारांची धर्मपत्नी, ‘सारीका देवी ‘ झाली. तीच्या प्रेमपाशात बद्ध झाल्याने सरदारांचं गढीकडे दुर्लक्ष होत होतंच पुर्वीचं वैभव हळूहळू लयाला जाऊ लागलं आणि त्यामुळेच अनेक वर्षे ऐकलेल्या गढीत दडवलेल्या संपत्तीची हाव हौसाक्काना स्वस्थ बसू देत नव्हती. सुहृद जन्माला आल्यानंतरही, स्वतः:ची फिगर, तारूण्य आणि सौंदर्य सांभाळण्याच्या नादात सारीका देवीनी त्याचं पालकत्व पूर्णपणे हौसक्काच्या हातात सोपवलेलं त्यामुळे लहानपणापासूनच त्यालाही तंत्र मंत्र विद्या यात आपल्यासारखंच हौसक्कानी त्याला चांगलंच पारंगत केलं होतं, दुर्दैव असं की कोवळया सुहृदचा असं माईंड कंडिशनिंग रितसर चालू असताना कोणालाही त्याच्याकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. जिचा बळी गेला ती सुहृदच्याच जुनिअर कॉलेज मधली एक मैत्रीण होती, जिला सुहृद ने गढी दाखवायला म्हणून आणलं होतं, तिचं नाव ‘मृण्मयी’, सुहृद ला ती आवडायची, माँ ना दाखवण्यासाठी म्हणून त्याने तिला गढीवर आणलेलं, पण तिला बघून माँ च्या डोक्यात वेगळाच प्लॅन शिजू लागला, गढी मध्ये प्रचंड प्रमाणात गुप्त खजिना लपवलेला आहे त्याच्या दंतकथा

हौसाक्का कडून त्याही गेली अनेक वर्ष ऐकत होत्याच, तो मिळवण्यासाठी एका अशा स्त्री चा बळी लागणार होता जी कुमारी आहे आणि जिला हनुवटीवर मध्यभागी, मानेवर उजव्या बाजूला आणि कंठाखालच्या खळगीत असे तपकीरी रंगाचे तीन तीळ आहेत, ही सगळी लक्षणं माँ ना ‘ मृण्मयी ‘ म्हणजे सुहृद ची ती मैत्रीण जी गढी बघायला म्हणून आली होती तिच्यात दिसली आणि तिथूनच त्या दोघींच्या डोक्यात हे थैमान सुरू झालं, त्यात त्यांनी सुहृद ला ही सामील करून घेतलं, सुहृद च्या मदतीनं हौसक्कानं ‘मृण्मयी’ ला गायब केलं खरं पण नंतर कळलं की ती कुमारी नव्हतीच, तिचं लग्न झालेलं होतं, आणि आता ती घटस्फोटित होती. अशा अर्धवट झालेल्या कामाने ‘हौसाक्का ‘बिथरली, गायब केल्यावर तिला मारून टाकणं हौसाक्काला अवघड नव्हतं पण अजून तिला मारलं नव्हतं हे खरं त्याच दरम्यान देवयानी गढीत आली, आणि हौसाक्का पुन्हा नव्या जोमाने बळीच्या तयारीला लागली, तोपर्यंत डोक्याला ताप ठरणाऱ्या मृण्मयीची पहिल्यांदा ‘जीभ’ छाटली गेली, सततची उपासमार, दहशत याने मृण्मयीच्या डोक्यावर परीणाम झाला, ही सर्व कथा ऐकून कॉमर्स कॉलेजची असून सायन्स साईड ला, सुहृदच्या डेस्क समोर घुटमळणारी ‘मृण्मयी करमळे ‘ ‘देवयानी ‘ला आत्ता कुठे आठवली आणि तिच्या डोळ्यात अश्रू आले. कॉलेज मध्ये केवढं

गाजलं होतं ते प्रकरण, इनफॅक्ट कॉलेजमध्ये आपण सगळे तिच्या गायब होण्यावर चर्चा करायचो त्या वेळी सुहृद अस्वस्थ होऊन बाहेर निघून जायचा तेव्हा आपल्याला वाटायचं तो खूप सेन्सेटिव्ह असल्या कारणाने जात असेल, त्या मागे हे होतं तर !..

त्या रात्री देवयानीच्या कुशीत शिरून 'वसुंधरा' खूप रडली, सुहृद आणि माँ चा आघात तिच्या सहनशक्तीच्या पलीकडला होता, लहानपणीचा कोवळा हसरा सुहृद, मोठेपणी तिचे लाड करणारा तिचा प्रेमळ भाऊ अशा अघोरी कृत्यात सामील असेल हे वसुंधरेला पचवताना जड जात होतं. दोन दिवस गढीत सगळ्यांबरोबर राहून देवयानी पुण्यात परत आली, मध्ये हे जे काही भय नाट्य घडलं त्याचा उल्लेखही तिने आई जवळ केला नाही, बाबांना काही अंशी कल्पना दिली, 'सोना 'ला मात्र बरोबर घेऊन यायला ती विसरली नाही. यथावकाश प्रताप, वसुंधरा आणि 'सरदार' तिला 'प्रताप 'करता मागणी घालायला आले, तेव्हा देवयानीला खरोखरच वाटलं नव्हतं की…

लहानपणी आजी म्हणायची, ' अशी नक्षत्रासारखी आहे माझी देवी, तिला किनई घोड्यावर बसून स्वतः राजकुमार येईल मागणी घालायला " ते शब्दशः खरं होईल !!!!..

**कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?

खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!

थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.

ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.

एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग

दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग

थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय

कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.

आनंद घ्या. आनंद द्या.

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com